# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २१ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## शपथ घेताच डोनाल्ड ट्रम्प यांचा धमकीवजा इशारा भारतासह ११ देशांमध्ये माजली खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमेरीका**

डोनाल्ड ट्रम्प यांनी शपथग्रहण केल्यानंतर ते अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष बनले आहेत. दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या ट्रम्प यांनी कारभाराची सूत्रे हाती घेताच जगात येत्या काळात अमेरिकेची भूमिका काय असेल याची झलक दाखवली आहे. सत्तेत आल्यानंतर ट्रम्प यांनी कॅनडा आणि मॅक्सिकोवर टॅरिफची घोषणा केली आहे. १ फेब्रुवारीपासून कॅनडा आणि मॅक्सिको यांच्यावर अमेरिकेकडून २५ टक्के टॅरिफ



लावला जाईल. त्याशिवाय ट्रम्प यांच्या एका आदेशानं ११ देशांमध्ये खळबळ माजली आहे. त्यात भारत आणि चीन यांचाही समावेश आहे.

**BRICS देशांना डोनाल्ड ट्रम्प यांची उघड धमकी**

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्रिक्स देशांना उघडपणे धमकी दिली आहे. सोमवारी शपथ घेताच ट्रम्प यांनी म्हटलं की, स्पेनसह ब्रिक्स देशांवर १०० टक्के टॅरिफ लावलं जाऊ शकते. ब्रिक्समध्ये सध्या १० देशांचा समावेश आहे. ज्यात ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका, मिस्त्र, इथियोपिया, ईराण आणि संयुक्त अरब अमीरात यांचा समावेश आहे. स्पेन ब्रिक्सचा भाग नाही तरीही स्पेन डोनाल्ड ट्रम्प यांच्या रडारवर आहे. मागील डिसेंबर महिन्यात ट्रम्प यांनी ब्रिक्स देशांवर १०० टक्के टॅरिफ लावण्याचा इशारा दिला होता परंतु त्यासाठी त्यांनी एक अट ठेवली होती.

**भारताची भूमिका काय?**

मागील काही वर्षांपासून ब्रिक्स संघटनेतील रशिया आणि चीन हे दोन देश अमेरिकेच्या डॉलरला पर्याय शोधत आहेत. ब्रिक्स देशांचे चलन सुरू करण्याच्या विचारात आहेत. भारत मात्र या प्रयत्नांपासून दूर आहे. दक्षिण आफ्रिकेत २०२३ मध्ये झालेल्या ब्रिक्सच्या शिखर परिषदेत अनेक देशांनी नव्या चलनाची व्यवहार्यता तपासण्याबाबत आग्रह धरला होता. ब्राझिलचे राष्ट्रपती लुईस इनासियो लूला डिसिल्व्हा यांनी याबाबत एक प्रस्तावही मांडला होता.

## सैफ अली खान पाच दिवसांनी परतणार घरी रुग्णालयातून मिळाला डिस्चार्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई**

अभिनेता सैफ अली खानवर १६ जानेवारी रोजी वांद्रे येथील त्याच्या राहत्या घरी चाकू हल्ला झाला होता. त्यानंतर सैफला मुंबईतील लीलावती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. या हल्लूयात सैफच्या मणक्याला गंभीर दुखापत झाली आहे. दरम्यान सैफ अली खानवर दोन गंभीर शस्त्रक्रिया पार पडल्या आहेत. आता सैफ अली खानच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत असून, पाच दिवसांच्या उपचारांनंतर त्याला रुग्णालयातून सोडण्यात आले आहे. सैफला लीलावती



रुग्णालयातून सोडण्यापूर्वी, पत्नी करीना कपूर खान आणि मुलगी सारा अली खान रुग्णालयात दाखल झाल्या होत्या.

दरम्यान मुंबई पोलिसांनी सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपीला ठाणे येथून अटक केली होती. शनिवारी मध्यरात्री उशिरा ठाणे येथील हिरानंदानी इस्टेट येथे सुरू असलेल्या मेट्रो बांधकामाजवळील कामगार छावणीतून त्याला अटक करण्यात आली. १६ जानेवारीला सैफ अली खानच्या घरात घुसून त्याच्यावर चाकू हल्ला केल्याची कबुली या हल्लेखोराने पोलिसांसमोर दिली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हा आरोपी एका रेस्टॉरंटमध्ये वेटर म्हणून काम करत होता. या दरम्यान त्याने विजय दास, बिजॉय दास, बीजे आणि मोहम्मद इलियास अशी अनेक नावे वापरली होती.

## उद्धव ठाकरे गटाला आणखी एक धक्का; शहरप्रमुखासह ३५ पदाधिकाऱ्यांची पक्षाला सोडचिठ्ठी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१छत्रपती संभाजीनगर**

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ठाकरे गटाला गळती सुरू झाली आहे. नुकतेच पक्षाचे राज्य संघटक एकनाथ पवार यांनी राजीनामा देत पक्षातील नेत्यांवर गंभीर आरोप केले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी संभाजीनगर येथील शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी यांनी उद्धव ठाकरे यांना पत्र पाठवून त्यांच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि छत्रपती संभाजीनगर पूर्व शहरप्रमुखपदाचा राजीनामा दिला आहे. स्वामी यांच्यासोबत पक्षातील ३५ पदाधिकाऱ्यांनीही सोडचिठ्ठी दिली आहे.

## दावोसमध्ये पहिला सामंजस्य करार गडचिरोलीसाठी

### कल्याणी उद्योग समूहाकडून पोलाद उद्योगामध्ये ५,२०० कोटींची गुंतवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१दावोस**

दावोस येथे सुरू असलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममधून महाराष्ट्रासाठी गुंतवणुकीसाठीचा पहिला सामंजस्य करार गडचिरोलीसाठी करण्यात आला आहे. कल्याणी समूहाकडून गडचिरोलीमध्ये पोलाद उद्योगासाठी ५,२०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. या संदर्भात कल्याणी उद्योग समूहाने महाराष्ट्र शासनासोबत सामंजस्य करार केला आहे.

कल्याणी समूह आणि महाराष्ट्र राज्य शासनामध्ये स्टील आणि संरक्षण क्षेत्रात करार करण्यात आला आहे. या माध्यमातून पोलाद उद्योगासाठी ५ हजार २०० कोटी रुपयांची गुंतवणूक गडचिरोलीत केली



जाणार आहे. त्यामाध्यमातून ४ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. कल्याणी समूहाचे प्रमुख अमित कल्याणी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत हा करार केला आहे.

स्वित्झर्लंडमध्ये दावोस येथे होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित आहेत. यंदा भारताने आपले सर्वांत मोठे शिष्टमंडळ त्यासाठी पाठवले असून ही बैठक पाच दिवस चालेल.

**दावोसमध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियन सज्ज**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक अध्यक्ष क्लॉस श्वाब यांची भेट घेतली. हरित ऊर्जा, ईलेक्ट्रीक व्हेईकल, उद्योग जगतातील अनेक नवीन घडामोडींवर या दोघांमध्ये यावेळी चर्चा झाली. महाराष्ट्राच्या विकासभरारीला त्यांनी यावेळी शुभेच्छाही दिल्या.

दावोसमध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियन आता सज्ज झाले असून, पुढचे दोन दिवस भरगच्च कार्यक्रमांचे असणार आहेत. महाराष्ट्रासाठी विक्रमी सामंजस्य करार यात होणार आहेत आणि विविध कंपन्यांसोबत बैठकाही होणार आहेत.

गेल्या वर्षीच्या गणेशोत्सवात क्लॉस श्वाब हे एका बैठकीसाठी मुंबईत आले होते. त्यावेळी १२ सप्टेंबर रोजी सपत्नीक त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या शासकीय निवासस्थानी येऊन श्रीगणेशाची आरती केली होती. या भेटीत त्या आठवणीलाही उजाळा देण्यात आला. या बैठकीने आज देवेंद्र फडणवीस यांच्या दावोसमधील भेटी, बैठकांचा श्रीगणेशा झाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी होरॅसिसचे अध्यक्ष फ्रँक जर्गन रिक्टर यांचीही भेट घेतली. फ्रँक हे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे माजी संचालक सुद्धा आहेत. येणार्या काळात मुंबईत जागतिक कंपन्यांची एक परिषद आयोजित करण्यासाठी त्यांनी यावेळी पुढाकार दर्शविला. नवीन तंत्रज्ञान, नाविन्य यावर भर देताना असे आयोजन राज्य सरकारसोबत सहकार्याने करण्याबाबत तसेच होरॅसिसचे मुंबईत मुख्यालय असण्याबाबत सुद्धा यावेळी प्राथमिक चर्चा झाली.

## ‘मतांचे विभाजन टाळण्यासाठी शिवसेनेने दिल्ली निवडणुकीत भाजपला दिला पाठिंबा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ठाणे**

शिवसेना पक्षप्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, त्यांच्या पक्षाने हिंदुत्वाच्या मतांमध्ये फूट पडू नये म्हणून दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपला पाठिंबा दिला आहे आणि त्यांचा पक्ष युतीच्या भागीदारांशी सल्लामसलत करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्यास तयार आहे. शनिवारी सायंकाळी ठाण्यातील राज्यातील आणि देशातील विविध भागातील कार्यकर्त्यांना शिवसेनेत सामील करून घेतल्यानंतर शिंदे पत्रकारांशी बोलताना बोलत होते. आम्ही नवी दिल्ली निवडणुकीत भाजपला पाठिंबा दिला आहे कारण आम्हाला हिंदुत्व मतांमध्ये फूट पडू नये आणि तेथे एनडीएचे सरकार आणायचे होते. मात्र आम्ही आमच्या आघाडीशी सल्लामसलत केल्यानंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकट्याने लढण्याचा निर्णय घेऊ. भागीदार, शिंदे म्हणाले. ते पुढे म्हणाले की, कट्टर सैनिकांना खात्री आहे की त्यांचा पक्ष बाळासाहेब ठाकरेंनी घालून दिलेल्या तत्त्वांचे पालन करत आहे आणि सत्तेसाठी ते त्यांच्या तत्त्वांशी तडजोड करणार नाहीत याची त्यांना खात्री आहे आणि ते मोठ्या संख्येने त्यांच्यासोबत आहेत, ते म्हणाले.

## वाल्मिक कराड गँगविरोधातील सर्वात मोठा पुरावा समोर

### सीसीटीव्ही फुटेजमध्ये मारेकरी–पोलीस एकत्र दिसले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१बीड**

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात वाल्मिक कराड यांचा पाय आणखी खोलात जाईल, असा पुरावा समोर आला आहे. हा वाल्मिक कराड गँगविरोधातील सर्वात मोठा पुरावा मानला जात आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येचा संबंध आवादा कंपनीकडून मागण्यात आलेल्या खंडणीशी जोडला जात आहे. २९ नोव्हेंबरला विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांच्याकडून आवादा कंपनीकडून खंडणी मागण्यात आली होती. त्यादिवशी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांची भेट झाल्याचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे.




हे सीसीटीव्ही फुटेज विष्णू चाटे याच्या केज येथील कार्यालयाबाहेर आहे. २९ नोव्हेंबरला वाल्मिक कराड या कार्यालयात आला होता. यावेळी वाल्मिक कराड याच्यासोबत संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करणारे प्रतीक घुले, सुदर्शन घुले आणि त्यांचे मित्र दिसत आहेत. विशेष म्हणजे संतोष देशमुख हत्याप्रकरणात संशयास्पद भूमिका राहिलेले आणि निलंबित झालेले पीएसआय राजेश पाटील हेदेखील वाल्मिक कराड यांना भेटल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे. राजेश पाटील यांचा विष्णू चाटे याला हॉटेलमध्ये भेटतानाचा एक व्हिडीओही व्हायरल झाला होता. त्यानंतर आता दुसऱ्या व्हिडीओमध्येही संतोष देशमुख हत्याप्रकरणात सहभागी असलेल्या वाल्मिक कराडच्या गँगसोबत राजेश पाटील दिसून आल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. आवादा कंपनीकडून खंडणी मागितली त्यादिवशी राजेश पाटील हे वाल्मिक कराडला का भेटले असावेत, हा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. त्यामुळे आता सीआयडी आणि एसआयटीकडून राजेश पाटील यांची चौकशी होण्याची शक्यता आहे.

विष्णू चाटेच्या कार्यालयाबाहेर हे सीसीटीव्ही फुटेज सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. याप्रकरणी अद्याप पोलिसांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, या सीसीटीव्ही फुटेजमुळे खंडणी प्रकरणात जामीन मिळवण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या वाल्मिक कराड याच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. वाल्मिक कराड याच्यावतीने विष्णू चाटे याने आवादा कंपनीकडे तब्बल २ कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी नकार दिल्यानंतर विष्णू चाटे आपल्या सहकाऱ्यांना घेऊन आवादा कंपनीत गेला होता. त्यावेळी तेथील सुरक्षा रक्षकाशी त्याचा वाद झाला. हा सुरक्षारक्षक संतोष देशमुख यांच्या मस्साजोग गावातील होता. त्यामुळे संतोष देशमुख कंपनीत गेले होते आणि त्यांचा विष्णू चाटेसोबत वाद झाला होता. यानंतर ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती.

## भाजप मोर्चेबांधणीत व्यस्त, काँग्रेस सुस्तच! स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक पूर्वतयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी तयार राहा, असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईत येऊन आमदारांना दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही तीन ते चार महिन्यात पालिका निवडणुका होतील, कामाला लागा, असा मंत्र दिला. यामुळे भाजप नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते सदस्य मोहिमेच्या माध्यमातून मोर्चेबांधणीत व्यस्त आहेत, तर काँग्रेस मात्र सुस्तच असल्याचे चित्र येथे दिसून येत आहे. प्रदेश काँग्रेसकडून कार्यक्रम आल्यानंतर, तो आम्ही राबवू, असे जिल्हा व शहर काँग्रेसचे म्हणणे आहे.

अमरावती लोकसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवल्यानंतरही काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत दारुण पराभवाचा सामना करावा लागला. जिल्ह्यातील आठ मतदार संघात काँग्रेसला एकही आमदार निवडून आणता आला नाही . निवडणुकीनंतर काँग्रेसमध्ये पराभूत मानसिकता खोलवर रुजल्याचे चित्र आहे. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी महापालिका, नगरपालिका तथा जिल्हा परिषदेत जाणे काँग्रेसच्या नेत्यांनी कधीचेच बंद केले.



आता आंदोलनाचीही हिम्मत नेत्यांमध्ये राहिली नाही, असे जाणवते.

**नेत्यांनी पुढाकार घेण्याची गरज**

ही स्थिती पाहता काँग्रेसचा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत टिकाव लागेल का, असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे. आगामी निवडणुका जिंकायच्या असेल तर जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यांना पुढाकार घ्यावा लागेल. नेत्यांना सर्वप्रथम पराभूत मानसिकता झटकावी लागेल. पक्षात आलेली मरगळ, निरूत्साह दूर करून पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवावा लागेल. मात्र, वरिष्ठ नेत्यांकडून असे काहीही होताना दिसत नाही.

**भाजपची सदस्यता मोहीम जोमात**

याउलट भाजप स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीला जोमाने लागला आहे. सदस्यता मोहीम जोरात सुरू आहे. भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते सर्वच प्रभागात दिसून येतात. आमदारही पदाधिकारी व कार्यकर्त्यांना बळ देताना दिसतात. विविध कार्यक्रमांचे आयोजन करून भाजप लोकप्रतिनिधी जनतेच्या संपर्कात आहेत.

## संपादकीय ......

# बांगलादेशी घुसखोरांची डोकेदुखी!

*अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणार्याला पोलिसांनी ठाण्यातून अटक केली. हा हल्लेखोर बांगलादेशी असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. त्यामुळे या प्रकरणाला सांप्रदायिक असे राजकीय वळण देण्याचा प्रयत्न फसला आहे. या प्रकरणातील इतर 'राजकीय' शक्यता प्राथमिक तपासात निकालात निघाल्याने तसा प्रयत्न करणारे राजकारणी तोंडघशी पडले आहेत. या मुद्यावर होणार्या राजकारणापेक्षा इतर देशातील लोकांचे आपल्या देशातील विविध भागात होणारे बेकायदा वास्तव्य ही खूप मोठी चिंतेची बाब आहे.*

*देशातील इतर राज्यांच्या तुलनेत मुंबई आणि महाराष्ट्राला हा धोका मोठा आहे. बांगलादेशातील एखादा व्यक्ती भारतात सहज दाखल होतो, त्याला आंतरराष्ट्रीय यंत्रणा अडवत नाहीत. त्यानंतर तो महाराष्ट्रासारख्या राज्यात येऊन राहतो, त्याही वेळेस कोणाला याबाबत शंका येत नाही. या ठिकाणी तो नोकरी मिळवतो. पुढे मुंबईतल्या प्रतिष्ठित अशा उच्चभ्रूंच्या वस्तीत बाराव्या मजल्यापर्यंत अगदी सेलिब्रिटी आणि नवाब असलेल्या अभिनेत्याच्या घरातील बेडरूमपर्यंत चाकू घेऊन जाऊन पोहचतो आणि हल्ला करतो. हे सगळंच अनाकलनीय आहे. भारतातील घुसखोरीपासून ते प्रतिष्ठित अभिनेत्याच्या घरापर्यंत पोहचलेल्या या हल्लेखोराने आपल्या देशाच्या सीमा सुरक्षेपासून ते स्थानिक सुरक्षा यंत्रणांतील ढिसाळ कारभार आणि फोलपणा समोर आणला आहे.*

*आपल्या देशात कोणीही कधीही कुठूनही घुसखोरी करू शकते, या ठिकाणी त्याला आधार किंवा पॅन कार्ड सहज मिळू शकते, ते बनावट जरी असले तरी त्याचा रहिवासी पुराव्यापुरता उपयोग करता येऊ शकतो. आपल्या देशात कुणीही गुन्हे करणार्यासाठी दाखल होऊ शकतो आणि गुन्हे करून परदेशात सहज पळून जाऊ शकतो. त्यामुळे परदेशातल्या गुन्हेगारांसाठी आपला देश एखाद्या उद्ध्वस्त धर्मशाळेसारखा झाला आहे. कोणीही येतो कुठेही राहतो, काहीही करतो, चाकू घेऊन हल्ले करतो, अगदी इथल्या प्रतिष्ठित अभिनेत्यावरही हल्ला करू शकतो, 'आओ जावो घर तुम्हारा' असा सगळा मामला आहे. अशा वेळी आपल्या सीमेवरील आणि अंतर्गत सुरक्षा यंत्रणा, गुप्तहेर यंत्रणा काय करतात, असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. कारण बाहेरून येणारे असेच लोक त्यांच्या सूत्रधारांसाठी स्लिपर सेल्स म्हणून काम करत असतात.*

*भारताची भूमी नेपाळमधील रहिवासी, रोहिंगे, बांगलादेशांसाठी नंदनवन ठरते आहे का? इथं आपण दुसर्याच्या घरात, केबिनमध्येही दाखल होतानाही परवानगीशिवाय उंबरठा ओलांडत नाही. परवानगीशिवाय आत येऊ नये, हे वाक्य दरवाजावर लिहिणे आपल्यासाठी भूषणावह असते, मात्र देश नावाच्या आपल्या घरात कोणीही, कसाही कुठूनही बिनदिक्कत शिरकाव करू शकतो. आपल्या राज्यात दाखल झालेल्या याच देशाचे नागरिक असलेल्या परप्रांतीयांच्या विरोधात आपल्याकडे राजकीय आंदोलने होतात, मात्र थेट परदेशातील बेकायदा घुसखोरी करणार्यांचा प्रश्न आपल्यासाठी दुय्यम असतो. निव्वळ धार्मिक मुद्यावरून राजकारण केले जाते.*

*घुसखोरी करणार्याने बेकायदा घुसखोरी करण्यातील गांभीर्यापेक्षा त्याचे नाव काय असते? यात इथल्या राजकीय नेत्यांना रस असतो. आपल्या राज्यातल्या दाटीवाटींच्या वस्त्यांमध्ये असे किती बेकायदा घुसखोर राहत असतील? हा आंतरराष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने चिंतेचा विषय असतो. त्यामुळे न्यायालयात याविषयी चिंता व्यक्त केली जाणे हे इथल्या सगळ्याच सुरक्षा यंत्रणांचे थेट अपयशच मानावे लागेल. कोट्यवधींचा घोटाळा करून, इथल्या नागरिकांना लुबाडून, आर्थिक यंत्रणांच्या हातावर तुरी देऊन आपल्या देशातून कोणीही परदेशात पळून जाऊ शकतो. कोणीही गुन्हे करण्यासाठी परदेशातून आपल्या देशात दाखल होऊ शकतो, ही अवस्था भयंकर आहे.*

*महाराष्ट्रात कोकणपर्यंत परदेशी घुसखोरांनी शिरकाव केला आहे. रत्नागिरीतल्या ग्रामपंचायतीने एका बांगलादेशी घुसखोराला जन्मदाखला दिल्याचे प्रकरण उघड झाले. दुसर्या एका प्रकरणात ५ वर्षांची व्हिसाची मुदत संपल्यानंतरही एक बांगलादेशी महिला चिपळूणमध्ये बिनदिक्कतपणे राहात असल्याचे उघड झाले. या महिलेने आधार, पॅनकार्ड असे नागरिकत्वाचे पुरावे बनवून घेतले होते. बेकायदा वास्तव्य करणारे बांगलादेशी किंवा इतर घुसखोर पडेल ती मजुरीची कामे करतात. भिवंडीतून शनिवारी एका बांगलादेशी नागरिकाला ताब्यात घेतले. त्याआधी उल्हासनगरातून बेकायदा वास्तव्य करणार्या १० बांगलादेशींना पकडण्यात आले.भिवंडी, उल्हासनगर, मुंब्रा तसेच इतर भागातही अनेकदा ठिकठिकाणी बेकायदा वास्तव्य करणार्या बांगलादेशी, रोहिंग्यांवर कारवाई करण्यात आली आहे. मुंबई, ठाणे तसेच राज्याच्या विविध भागात नेपाळमधून आलेल्या नागरिकांनाही कुठलीही चौकशी न करता सहज काम दिले जाते. इमारत बांधकामे, विटभट्टी, किरकोळ वस्तू उत्पादनांच्या ठिकाणी अतिशय स्वस्तात असे परदेशातले मजूर कामाला लावले जातात. स्वस्तात मनुष्यबळ मिळत असल्याने संबंधित मालकही त्यांची चौकशी न करता त्यांना आश्रय देतात. राज्यात बेकायदा वास्तव्य करणारे नायजेरियन, बांगलादेशी, रोहिंग्यांचा प्रश्न आंतरराष्ट्रीय सुरक्षा आणि या देशातील नागरिकांच्या जीविताशी संबंधित आहे. एवढे तरी इथल्या जबाबदार यंत्रणांनी ध्यानात घ्यायला हवे. त्यासाठी इथल्या एका अभिनेत्यावर जीवघेणा हल्ल्या होण्याची वाट पहावी लागते, हा विषय आपल्याकडील यंत्रणांचा ढिसाळपणा उघड करणारा आहे.*

# SIP vs STP: म्युच्युअल फंडात गुंतवणूक करता?

## जाणून घ्या दोघांत कोणता आहे बेस्ट ऑप्शन

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

एसआयपीच्या माध्यमातून म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या कोट्यवधींमध्ये आहे. मात्र, एसटीपीबाबत फार कमी जणांना माहिती आहे. म्युच्युअल फंड स्कीम्समध्ये ठराविक तारखेला नियमित अंतरानं अनेकदा महिन्यातून एकदा) एसआयपीची गुंतवणूक केली जाते हे आपल्या सर्वांनाच माहित आहे. त्याचवेळी एसटीपीमध्ये गुंतवणूकदार म्युच्युअल फंड स्कीम्समध्ये (सहसा डेट फंड) एकरकमी रक्कम गुंतवतात आणि नंतर नियमित अंतराने इक्विटी योजनांमध्ये ट्रान्सफर करतात.

दुसऱ्या शब्दांत सांगायचं झालं तर एसटीपीच्या मदतीनं गुंतवणूकदार कमी जोखमीच्या योजनेतून डेट फंडातून इक्विटी फंडांसारख्या उच्च जोखमीच्या योजनेत पैसे हस्तांतरित करू शकतात. एसटीपी गुंतवणूकदारांना जोखीम व्यवस्थापित करण्यास आणि चांगला परतावा मिळविण्यात




मदत करतात.

दोघांमधील प्रमुख फरक

एसआयपी अंतर्गत गुंतवणूकदाराच्या बँक खात्यातून थेट म्युच्युअल फंडात पैसे जमा केले जातात, ज्यामुळे शिस्तबद्ध गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळते. याउलट, एसटीपीला डेट फंडांमध्ये प्रारंभिक एकरकमी गुंतवणुकीची आवश्यकता असते, ज्यातून नियमितपणे इक्विटी फंडांमध्ये पैसे हस्तांतरित केले जातात, ज्यामुळे कालांतरानं धोरणात्मक गुंतवणूक करता येऊ शकते.

दोघांचेही निरनिराळे फायदे

एसआयपी रुपयाच्या किंमतीच्या सरासरीचा फायदा देतात, ज्यामुळे किंमती कमी असताना जास्त युनिट्स खरेदी करून आणि किंमती जास्त असताना कमी युनिट्स खरेदी करून बाजारातील चढउतारांचा प्रभाव कमी होतो. याव्यतिरिक्त, एसआयपी लवचिक आहेत, ज्यामुळे गुंतवणूकदारांना सर्वात कमी रकमेसह सुरुवात करण्यास आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार योगदान करण्यास अनुमती मिळते.

एसटीपीमुळे बाजारातील जोखीम कमी होण्यास मदत होते. शेअर बाजाराच्या कामगिरीच्या आधारे मालमत्तेचं वाटप करून परतावा वाढवतो. एसटीपी विशेषत: अधिक निधी असलेल्या गुंतवणूकदारांसाठी फायदेशीर आहेत आणि हळूहळू इक्विटीमध्ये गुंतवणूक करू इच्छितात, ज्यामुळे एकरकमी गुंतवणुकीशी संबंधित बाजारातील अस्थिरतेचा धोका कमी होतो. एसटीपी बाजारातील चढउतारांपासून गुंतवणूकदाराचं रक्षण करतात. एसटीपीमुळे गुंतवणूकदाराला रुपी कॉस्ट एव्हरेजिंगचा फायदा होतो. एसटीपीच्या मदतीनं गुंतवणूकदाराला बाजारातील चढउतारांची चिंता करावी लागत नाही.

# यंदा टरबूज, खरबूज लागवड करायची आहे? मग 'हे' तंत्र वापरा आणि उत्पादन वाढवा

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक** – उन्हाळ्यात अनेक शेतकरी मोठ्या प्रमाणावर टरबूज आणि खरबूज पिकांची शेती करतात. मात्र अनेकदा अपुऱ्या व्यवस्थापनेमुळे अपेक्षित उत्पादन मिळत नाही. परिणामी उत्पादनावर केलेला खर्च ही निघत नाही. याच अनुषंगाने आज आपण जाणून घेणार आहोत हमखास उत्पादनाचे सुधारित टरबूज आणि खरबुज लागवड तंत्र.

**टरबूज– सिट्रुलस व्हलगॅरिस (वॉटर मेलॉन).**

**जमीन :** टरबूज पिकासाठी हलकी, पोयट्याची, वाळु मिश्रित व पाण्याचा निचरा असणारी जमीन लागवडीस उपयुक्त आहे. चुनखडीयुक्त व चोपण जमिनीत टरबुजाची लागवड करू नये.

**हवामान :** प्रामुख्याने उन्हाळयात घेतले जाणारे हे पीक २५ अंश ते ३० अंश सेल्सिअस तापमानामध्ये चांगला प्रतिसाद देते. या पिकासाठी उष्ण व कोरडे हवामान आवश्यक आहे. वातावरणामध्ये थंडी, दमटपणा किंवा धुके असल्यास पिकाच्या वाढीवर परिणाम होतो. भर पावसाळ्याचे दिवस सोडल्यास वर्षभर कलिंगडाची लागवड करता येते.

**सुधारीत जाती :** शुगर बेबी, अर्का माणिक, अर्का ज्योती तसेच टरबुजाच्या खाजगी कंपन्यांच्या भरपूर जाती बाजारामध्ये उपलब्ध आहेत. सद्य परिस्थितीमध्ये शुगर क्वीन जात शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरली आहे.

**बियाणे प्रमाण :** साधारणत: टरबुजाच्या लागवडीसाठी सुधारित जातीचे हेक्टरी अडीच ते तीन किलो बियाणे पुरेसे आहे तर संकरीत जातीचे ५०० ते ६०० ग्रॅम बियाणे प्रती हेक्टरी आवश्यक आहे.

**लागवड :** टरबुजाची लागवड डिसेंबरचा दुसरा आठवडा ते फेब्रुवारी मध्यापर्यंत करता येते. या पिकाची लागवड गादीवाफ्यावर देखील करता येते.

**अन्नद्रव्य व्यवस्थापन :** लागवडीपूर्वी जमिनीची योग्य मशागत करून १५ ते २० टन शेणखत प्रती हेक्टरी द्यावे. लागवडीपूर्वी ५०:५०:५० किलो नत्र : स्फुरद : पालाश प्रति हेक्टरी, लागवडीनंतर – एक महिन्याने ५० किलो प्रति हेक्टर नत्र खताची मात्रा द्यावी.

**पाणी व्यवस्थापन :** टरबूजाच्या पिकाकरीता पाण्याचे योग्य वेळी नियोजन करणे आवश्यक आहे. टरबूजाचे पीक जसे वाढेल तसे पाण्याची गरजही वाढते. फळ लागण्याच्या कालावधीत पाण्याचा ताण बसणार नाही याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच पाण्याचा पिकांच्या मुळांशी जास्त संपर्क आल्यास रोग पडण्याची शक्यता जास्त असते.

**काढणी व उत्पादन :** टरबूजाचे फळ पिकल्यावर देठ सुकतात. पुर्ण पक्व झालेले टरबूजातून बोटाने वाजवल्यावर डबडब असा आवाज येतो. तसेच जमिनीवर टेकवलेला टरबुजाचा भाग पिवळसर पडतो. तसेच पिकाचा कालावधी ९० ते १२० दिवसांचा आहे. योग्य व्यवस्थापन व रोग कीड नियंत्रण केल्यास टरबूजाचे हेक्टरी ४५ ते ५० टन उत्पादन मिळते.



**खरबूज – कुकुमिस मेलो (मस्क मेलॉन)**

**जमीन :** खरबूज पिकासाठी हलकी, पोयट्याची जमीन लागवडीस उपयुक्त आहे. चुनखडीयुक्त व चोपण जमिनीत खरबुजाची लागवड करू नये.

**हवामान :** प्रामुख्याने उन्हाळ्यात घेतले जाणारे हे पीक २४ अंश ते ३० अंश सेल्सिअस तापमानामध्ये चांगला प्रतिसाद देते. या पिकासाठी उष्ण व कोरडे हवामान आवश्यक आहे. वातावरणामध्ये थंडी, दमटपणा किंवा धुके असल्यास पिकाच्या वाढीवर परिणाम होतो.

**सुधारित जाती :** पुसा शरबती, दुर्गापुर मधु, अर्का जीत, अर्का राजहंस, पंजाब सुनहरी. तसेच खरबूजाच्या खाजगी कंपन्यांच्या भरपुर जाती बाजारामध्ये उपलब्ध आहेत. सद्य परिस्थितीमध्ये कुंदन ही जात शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरली आहे.

**बियाणे प्रमाण :** खरबुजाच्या लागवडीसाठी सुधारित जातीचे हेक्टरी दीड ते दोन (१.५ – २) किलो बियाणे पुरेसे आहे तर संकरीत जातीचे २०० ते २५० ग्रॅम बियाणे प्रति हेक्टरी आवश्यक आहे.

**लागवड :** खरबुजाची लागवड डिसेंबरचा दुसरा आठवडा ते फेब्रुवारी मध्यापर्यंत करता येते. या पिकाची लागवड रोपे तयार करून किंवा टोकन पद्धतीने करता येते. लागवडीचे अंतर १.५ ͜ १.० मीटर ठेवावे.




**पाणी व्यवस्थापन :** खरबुजाच्या पिकाकरीता पाण्याचे योग्य वेळी नियोजन करणे आवश्यक आहे. खरबूजाचे पीक जसे वाढेल तसे पाण्याची गरजही वाढते. फळ लागण्याच्या कालावधीत पाण्याचा ताण बसणार नाही याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच पाण्याचा पिकांच्या मुळांशी जास्त संपर्क आल्यास रोग पडण्याची शक्यता जास्त असते.

**काढणी व उत्पादन :** खरबूजाचे फळ पिकल्यावर मधुर व सुवासिक वास येतो. तसेच काढणी योग्य झालेल्या खरबूजाचे देठ सुकतात. या पिकाचा कालावधी ९० ते १०० दिवसांचा असून २० ते २५ दिवसात काढणी पूर्ण होते. योग्य व्यवस्थापन व रोग कीड नियंत्रण केल्यास खरबूजाचे हेक्टरी २५ ते ३० टन उत्पादन मिळते.

**प्रा. संजय बाबासाहेब बडे** सहाय्यक प्राध्यापककृषि विद्या विभागदादासाहेब पाटील कृषि महाविद्यालयदहेगाव तालुका वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर.




# रोज सकाळी आल्याची पावडर खाण्याचे फायदे

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

भारतीय स्वयंपाकघरात आल्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. लोकांना आल्याचा चहा खूप आवडतो. आले हे आरोग्यासाठीही खूप फायदेशीर मानले जाते.ताज्या आल्यापेक्षा वाळलेले किंवा सुकवलेले आले जास्त फायदेशीर समजले जाते. आयुर्वेदानुसार, एक चमचा सुंठ पावडर खाणे फायदेशीर मानले जाते. आल्यामध्ये जिंजरॉल नावाचे संयुग आढळते. जे रक्तातील साखरेची पातळी संतुलित करण्याचे आणि मेंदूचे पोषण करण्याचे काम करते.

**पचनसंस्था सुधारते:**

आल्यामध्ये पाचक एन्झाइम्स असतात जे पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात. हे अन्न पचण्यास आणि पोषकद्रव्ये शोषण्यास मदत करते.

**सर्दी आणि खोकल्यापासून आराम:**आल्यामध्ये दाहकविरोधी गुणधर्म असतात ज्यामुळे सर्दी आणि खोकल्यापासून आराम मिळतो. घसादुखी कमी करण्यासाठीही हे फायदेशीर आहे.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते:**आल्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि इतर अँटीऑक्सिडंट असतात जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी मदत करतात. हे शरीराला रोगांशी लढण्यास मदत करते.

**वजन कमी करण्यास मदत करते:**आल्यामध्ये फायबर आणि अँटीऑक्सिडंट असतात जे वजन कमी करण्यास मदत करतात. हे भूक कमी करण्यास आणि पचनक्रिया सुरळीत करण्यासाठी देखील मदत करते.

**त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर:**आल्यामध्ये अँटिऑक्सिडेंट असतात जे त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर असतात. हे त्वचेला मॉइश्चरायझ करण्यास आणि सुरकुत्या कमी करण्यास मदत करते. तसेच केस मजबूत आणि चमकदार बनवण्यास देखील मदत करते.



**मधुमेह नियंत्रणात:**आल्यामध्ये फायबर आणि अँटीऑक्सिडंट असतात जे मधुमेह नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. तसेच रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यासही यामुळे मदत होते.

**हृदयासाठी फायदेशीर:**आल्यामध्ये पोटॅशियम असते जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. हे रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि हृदयविकाराचा धोका कमी करण्यास मदत करते.

**आले पावडरचे सेवन कसे करावे ?** आले वाळवून आणि बारीक करून त्याची पावडर बनवा, एक चमचा आले पावडर गरम पाण्यात किंवा चहामध्ये मिसळा आणि दररोज प्या. तुम्ही तुमच्या जेवणातदेखील आले पावडर घालू शकता.

# अमरावती सायकलींग असोसिएशन चा विदर्भ स्तरीय सायकल स्पर्धेचे दुसरे संस्करण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

दुसर्या विदर्भ स्तरीय सायकल स्पर्धेचे यशस्वी आयोजन रविवारी अमरावती येथील जुना बायपास स्थित सलूजा सेलिब्रेशन लॉन व फर्निचर शोरुम येथून करण्यात आले. या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांतील ३०० हून अधिक उत्साही ८ विविध वयोगटातील सायकलपटूंनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे उद्घाटन जागतिक किर्तीचे सायकल पटू डॉ अमित समर्थ नागपूर यांच्या हस्ते संजय मेंडसे, अतुल कळमकर, लक्ष्मीकांत खंडागळे, पियूष क्षीरसागर, डॉ सुरिता डफळे, प्रविण जयस्वाल, अमनप्रीत सलुजा, ललित बाहेती, सागर धनोडकर ह्यांचे उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लोकप्रिय लोक्रतिनिधी रवि भाऊ राणा व मा. खा. नवनीत राणा यांच्या तर्फे सर्वांचे लाडके सुनीलभाऊ राणा, विवेक काळकर, डॉ बबन बेलसरे, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ श्रीनिवास देशपांडे, प्रायोजक बाहेती ब्रदर्स चे ललित बाहेती, सलुजा लॉन जगविंदर(सिटू) सलुजा, सरोदे ऑप्टिकल चे सचिन सरोदे, गंगा प्लायवूड यश राजकुमार अग्रवाल, प्रा. सतीश दवंडे, रघुवीर मिठाई चे संचालक दिलीपजी पोपट आदि मान्यवर ह्यांचे उपस्थितीत पार पडला.




मुले व मुली आणि खुला गटांमध्ये वेगवेगळ्या वयोगटांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. मुख्य आकर्षण ५० किलोमीटर अंतराची स्पर्धा होती.

प्रथम क्रमांक आशिष बोरकर खुला पुरुष १:३८:१०

दुसरा क्रमांक प्रशांत कालबेंडे १:३८:१२

तृतीय क्रमांक राजेश जोधिराम जाधव १:३८:१३

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २१ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण


# ...अखेर मंत्र्यांचे 'पीए' ठरले; १७ मंत्री अद्याप 'पीए'विना

## महसूल विभागातील १५ अधिकारी नियुक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती :** राज्य मंत्रिमंडळाचे गठण झाल्यानंतर आता खऱ्या अर्थाने कामकाजास गती मिळाली असून, मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी चाळणी लावून त्यांचे स्वीय सहायक (पीए) निवडले आहेत, तर मंत्रिमंडळातील १७ मंत्र्यांना अद्याप चांगल्या 'पीए'चा शोध आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कामाचा धडाका सुरू केला असताना त्यांचे सहकारी मात्र आवडीतील 'पीए'च्या शोधात होते. अखेर हा शोध संपला आहे. सामान्य प्रशासन विभागाने १७ जानेवारी रोजी मंत्र्यांसाठी 'पीए' आणि विशेष कार्य अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या आहेत. शासनाच्या कार्यालयीन आस्थापनेवर असलेल्या वर्ग १ व वर्ग २ च्या अधिकाऱ्यांना आता मंत्र्यांच्या सेवेत 'ऑन ड्युटी' तैनात करण्यात आले आहे. असे असले तरी स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी असल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र वित्त विभागाच्या मान्यतेसह द्यावे लागणार आहे.



**कोण कुणाचे पीए**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे** : जिल्हा नियोजन अधिकारी रवींद्र काळे, **उपमुख्यमंत्री अजित पवार** : पशुधन विकास अधिकारी डॉ. अमर भडंगे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे : अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, उपजिल्हाधिकारी नीलेश श्रीमी, तहसीलदार प्रशांत पाटील व कक्ष अधिकारी राहुल गांगुर्डे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील : उपायुक्त जयदीप पवार, नायब तहसीलदार डॉ. गौरी शंकर चव्हाण, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ : अवर सचिव नंदकुमार आंदळकर, उपमुख्य कार्यकारी भूपेंद्र बेडसे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील : लेखापरीक्षक बाळासाहेब यादव, अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे : मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रशांत भामरे, कौशल्य व रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा : उपजिल्हाधिकारी महेश शेवाळे, पंकज पाठक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे : अपर जिल्हाधिकारी मंदार वैद्य, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके : उपजिल्हाधिकारी ललीत वऱ्हाडे, डीपीओ मुरलीधर वाडेकर आणि तहसीलदार सुरेश कव्हाळे, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे : उपसचिव संतोष गावंडे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले : एसडीओ सुधाकर भोसले, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे : सहसचिव संतोष पाटील, अन्न व औषधी प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ : उपजिल्हाधिकारी मुकेश भोगे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे : उपसचिव प्रल्हाद रोडे, सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट : उपलेखा अधिकारी अभय देशमुख, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक : सहायक आयुक्त शरद खाडे, रोहयो मंत्री भरत गोगावले : अवर सचिव गणेश काथवटे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील : उपजिल्हाधिकारी विजयसिंह पाटील.

**१७ मंत्र्यांना पीएची प्रतीक्षा**

राज्य मंत्रिमंडळातील मंत्री संजय राठोड, नितेश राणे, उदय सामंत, गिरीश महाजन, गुलाबराव पाटील, गणेश नाईक, दादाजी भुसे, जयकुमार रावल, अतुल सावे, शंभुराज देसाई, आशिक शेलार, आदिती तटकरे, जयकुमार गोरे, मकरंद पाटील, आकाश पुंडकर, प्रकाश आबिटकर या १७ मंत्र्यांना पीएचा शोध असणार आहे.

### राज्यमंत्री म्हणून सहा आमदारांनी शपथ घेतली

त्यातील केवळ चार राज्यमंत्र्यांना पीए मिळाले आहे. यात पंकज भोयर, मेघना बोर्डीकर, इंद्रनील नाईक, माधुरी मिसाळ यांचे भाग्य उजळले. योगेश कदम आणि आशिष जयस्वाल हे पीएविना आहेत.

# वरुड नगरपरिषदेत आमदार उमेश यावलकर यांची महत्त्वपूर्ण बैठक

## वरुड शहराच्या विकासाला चालना: सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन आणि नदी सौंदर्यीकरणावर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१वरुड** - वरुड नगरपरिषदेत आमदार उमेश यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली शहराच्या विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगरसेवक आणि विविध विभागांचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत शहरातील सांडपाणी व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश आमदारांनी नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना दिले. तसेच, शहरातील सर्व नाले/नाली स्वच्छ करून पाणी गाळमुक्त करण्यासाठी मोहीम राबवण्याचे आदेश दिले. दरम्यान शहरातील सांडपाण्याकरीता भुयारी गटार योजनांवर चर्चा करण्यात आली. शहरातील घनकचरा व्यवस्थापन व कचरा संकलनासाठी आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्याची सूचना करण्यात आली. कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर, व कंपोस्ट खत निर्मितीसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यावर भर देण्यात आला. चुडामन नदीच्या सौंदर्यीकरणासाठी



विशेष आराखडा तयार करण्यात येणार असल्याची घोषणा बैठकीत करण्यात आली. यासोबतच सांडपाण्यावर प्रकीया करुन नदीचा प्रवाह वर्षभर टिकून राहावा यासाठी जलसंधारण उपाययोजना आणि नदीचे गाळ काढण्याचे नियोजन करण्यात येईल. नदीकाठावर पर्यावरणपूरक प्रकल्प राबवून या ठिकाणी नागरिकांसाठी फिरण्यासाठी उद्यान, पदपथ आणि बसण्यासाठी जागा उभारण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. शहरातील रस्त्यांच्या रखडलेल्या कामांवर चर्चा करत आमदारांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामांना वेग देण्याचे निर्देश दिले. निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम निश्चित करून कामे लवकर पूर्ण करण्याचे ठरवण्यात आले. पाणीपुरवठ्याशी संबंधित अडचणी दूर करण्यासाठी जलवाहिनींच्या देखभालीचे काम हाती घेण्यात येईल. नवीन योजनेतून वरुड शहराला ३० एप्रिल २०२५ पर्यंत निश्चीतपणे पाणीपुरवठा केल्या जाईल. त्याअनुषंगाने कार्यवाही करुन जलदगतीने कामे पुर्ण करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. वरुड नगर परीषदेकडे नागरीकांच्या प्रलबीत असलेल्या विविध परवाणग्या त्वरीत देणे, नागरिकांच्या अडचणी तत्काळ सोडवण्याच्या सूचना देण्यात आल्या. वरुड शहरातील विकासकामांसाठी सर्व विभागांनी समन्वय साधून काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

या बैठकीद्वारे वरुड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, चुडामन नदीचे सौंदर्यीकरण, रस्त्यांची कामे, पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांसारख्या विषयांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

# विद्याभारती महाविद्यालयाची राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न

## फिरता चषक इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च बडनेराच्या कु. नफिसा हुसेन कडे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती:** स्थानिक विद्याभारती महाविद्यालय, कॅम्प अमरावती येथे दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. महाविद्यालयाने तरुणानंमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी व त्यातून निर्मित होणाऱ्या विचारांना मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे या उद्देशाने राज्यस्तरावरील ही वक्तृत्व स्पर्धा मागील दहा वर्षांपासून आयोजित केली जात आहे. या स्पर्धेला दरवर्षी राज्यभरातून विद्यार्थ्यांचा फार मोठा प्रतिसाद लाभत असतो. नुकत्याच पार पडलेल्या या स्पर्धेमध्ये बडनेरा येथील कु. नफिसा हुसेन, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च हिने प्रथम पारितोषिक मिळवून फिरता चषक व रोख रुपये ११०००/- पटकाविले. राज्य भरातील विविध विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातून बहुसंख्येने स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेचे रितसर उद्घाटन सकाळी दहा वाजता अमरावतीचे पोलीस उपायुक्त श्री गणेश शिंदे यांचे हस्ते तर संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. रघुनाथ रोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर, स्पर्धेचे संयोजक प्रा. डॉ. आर. एम. पाटील, विद्या भारती जेम्स चे समन्वयक उपप्राचार्य एच. के. सिसोदिया व्यासपीठावर उपस्थित होते.या वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वचिंतनातून निर्माण केलेले विचारधन उधळता यावे, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा, इप्सित ध्येय गाठण्याच्या दृष्टीने तरुण प्रवृत्त व्हावेत हा हेतू बाळगून महाविद्यालय असे उपक्रम घेऊन सतत प्रयत्नशील व सजग असते. प्रास्ताविक करताना डॉ. आर. एम. पाटील यांनी स्पर्धेसाठी नवे आणि ज्वलंत विषय शोधून तरुण पिढीला संवादासाठी प्रेरित केले. त्यांनी वास्तवाची जाणीव व्हावी, वाचन व चिंतनाची सवय लागावी आणि या चिंतनातून निर्माण झालेले विचार वाणीतून व्यक्त करावेत, असा स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला.स्पर्धेचे उद्घाटन सकाळी दहा वाजता अमरावतीचे पोलीस उपायुक्त श्री. गणेश शिंदे यांच्या हस्ते पार पडले. आपल्या उद्घाटनपर भाषणात श्री. शिंदे यांनी तरुणाईच्या व्यक्तिमत्त्व विकासात वक्तृत्व कौशल्याच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना संवाद कौशल्ये



आत्मसात करण्याचे महत्त्व पटवून दिले.महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात स्पर्धेच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला., विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमता वाढविणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांना वाचन, चिंतन आणि संवाद या माध्यमातून आत्मविश्वास वाढविण्याची संधी देते. यावर्षीच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या उत्साहामुळे आम्हाला प्रेरणा मिळाली असून, आम्ही भविष्यात ही स्पर्धा राज्यस्तरावरून राष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्याचा आमचा मानस आहे त्याद्वारे अधिकाधिक विद्यार्थ्यांना विचारमंथनाचे व्यासपीठ मिळेल, असे त्यांच्या भाषणातून स्पष्ट झाले.

पारंपारिक दीप प्रज्वलन करून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली या स्पर्धेच्या परीक्षणाची जबाबदारी डॉ. गोविंद तिरमनवार , डॉ. प्रशांत ठाकरे व डॉ. सुशांत ठोके यांनी सांभाळली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एन. एन. काकपुरे यांनी केले स्पर्धा आटोपताच सायंकाळी विजेत्या स्पर्धकांना बक्षीसे वितरीत करण्यात आली. यामध्ये बडनेरा येथील कु. नफिसा हुसेन हिने प्रथम पुरस्कार मिळविला. याप्रसंगी प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. आर. डी. सिकची यांनी विद्यार्थ्यांना वक्तृत्व व वादविवाद कौशल्य व्यक्तिमत्व विकासासाठी कशाप्रकारे आवश्यक आहे हे सोदाहरण स्पष्ट केले व सर्व स्पर्धकांना भविष्यातील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्यात. यावेळी संस्थेच्या उपाध्यक्ष प्रो. डॉ. मिथिलेश राठोर मॅडम, ह्या याठिकाणी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. स्पर्धेचे अन्य विजेते द्वितीय पुरस्कार (स्व. चंद्रकला बोडखे स्मृती प्रित्यर्थ) रोख रुपये ७१०० इग्नू सेंटर, नागपूर येथील रितेश तिवारी तर तृतीय पुरस्कार श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील कु. वैष्णवी विनोद राठोड (स्व. रत्नप्रभा वाकोडे स्मृती प्रीत्यर्थ) रोख ३१०० रुपये तर उत्तेजनार्थ पुरस्कार (स्व. बी. जी. कडू स्मृति प्रीत्यर्थ) रोख रुपये २१०० आदित्य दराडे, माणिकचंद पहाडे लॉ कॉलेज, संभाजीनगर यांनी पटकावले. याप्रसंगी प्रो. डॉ. मिथिलेश राठोर यांनी विद्यार्थ्यांना वक्तृत्व व वादविवाद कौशल्य व्यक्तिमत्व विकासासाठी कशाप्रकारे आवश्यक आहे हे सोदाहरण स्पष्ट केले कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर यांनी यावेळी अध्यक्षीय मनोगत मांडले. परीक्षक डॉ. गोविंद तिरमनवार , डॉ. प्रशांत ठाकरे व डॉ. सुशांत ठोके यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या सूचना केल्यात. काही स्पर्धकांनी प्रातिनिधिक मनोगते मांडलीत. या समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीरंग देशमुख यांनी केले.

स्पर्धेकरिता प्रा. डॉ. डी. एस. रंगाचार्य, प्रा. डॉ. व्ही. पी. शेकोकार, प्रा. डॉ. जी. डी. बनसोड, प्रा. डॉ. एस. के. रोड्डे, प्रा. डॉ. मोनाली घुरडे, प्रा. डॉ. प्रतिक उपासे, प्रा. डॉ. ए. ओ. चव्हाण, प्रा. डॉ. रोहित बुटले, प्रा. चेतन जाधव, प्रा. जयंत बनसोड, प्रा. अमित इंगोले, प्रा. डॉ. सिद्धू राठोड, प्रा. राणा आफरीन, यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# जयस्तंभ चौक ते तहसील कार्यालयपर्यंत रस्त्याचे काम रखडले

## अपघातांचे प्रमाण वाढले, कंत्राटदार व अभियंता कुंभकर्णी झोपेत!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१चांदूर बाजार-** चांदूर बाजार शहरातील तहसील कार्यालय ते जयस्तंभ चोक या मुख्य चौका पर्यंतचे काम गेल्या ४-५ महिन्यांपासून रखडले असून मोठ्या प्रमाणात अपघात वाढले आहे त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे चांदूर बाजार तहसील कार्यालय ते जयस्तंभ चौका पर्यंतचे कामाचा निधी ५ कोटी रुपये शासनाने मंजूर केला असता सार्वजनिक बांधकाम उपविभाग चांदूर बाजार मार्फत कामाला सुरवात झाली होती तर गेल्या ४-५ महिन्यांपासून काम रखडले आहे संबंधित कंत्राटदार व सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता या कडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करत आहे यासह कंत्राटदार रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करत आहे असा आरोप नागरिकांनी केला सणासुदीच्या दिवसात शहरवासीयांना नाहक त्रास सहन करावा लागत आहेजयस्तंभ चौकापासून चांदूर पोलीस स्टेशन पर्यंत मुख्य रस्त्याचे काम गेल्या सहा महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आले होते त्यावेळी हे काम सुरू केल्याने व्यापारी व नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला हा रस्ता शहरातील मुख्य रस्ता असल्याने नेहमी रहदारी असते रस्त्यावर अनेक कृषी केंद्र, दवाखाने, हार्डवेअर, बँका, ग्रेन मार्केट, कापड दुकाने आदी दुकाने आहेत यामुळे या मार्गावर कायम वर्दळ असते यासह बस



स्थानक व पोलीस स्टेशन असल्यामुळे महाविद्यालयातील विध्यार्थी व चिमुकल्यांचा अनेकदा किरकोळ अपघात झाल्याच समोर आले असतांना संबंधित कंत्राटदाराने या कडे दुर्लक्ष केले व रस्त्यावर दगडाचे ढीग पडल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे या रस्त्यातून मार्ग काढताना दुचाकी आणि चारचाकी चालकांना तारेवरची कसत करावी लागत आहे त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही अपघातात मोठ्या प्रमाणात जीवितास हाणी झाल्यास याला जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### जीवितास हानी झाल्यास जबाबदार कोण?

सदर रस्त्यावर बस स्थानक व पोलीस स्टेशन असल्यामुळे महाविद्यालयातील विध्यार्थी व चिमुकल्यांचा अनेकदा किरकोळ अपघात झाला यासह काही नागरिकांची दुचाकी व चारचाकी वाहन रस्ताच्या खाली उतरले आहेत तर काहींची धडक झाली आहे मोठी जीवितास हाणी झाल्यास याला जबाबदार कोण राहणार असा प्रश्न आता त्रस्त नागरिक करित आहे.

### अपघातांचे प्रमाण वाढल्याने कंत्राटदारावर कार्यवाही करा!

सदर रस्तावर दैनंदिन अपघात होण्याचा सपाटा सुरूच आहे माहितीनुसार संबंधित कंत्राटदार म्हणतात मजूर नाही व बिल मिळाले नाही त्यामुळे काम बंद आहे अशे असतांना रोज अपघात होत असल्यामुळे कंत्राटदारावर कार्यवाही करा अशी मागणी आता नागरिक करित आहे

# शंकरपट आयोजनाबाबत पशुसंवर्धन विभागाच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अकोला,-** शंकरपट आयोजनाबाबत जिल्ह्यातून प्रशासनाला अर्ज प्राप्त होत आहेत. आयोजनाच्या नियमांबाबत जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी सूचना जारी केल्या आहेत.बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यासाठी आयोजकांनी किमान १५ दिवस आधी विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रांसह करावा. अर्जासह हमीच्या स्वरूपात पन्नास हजार रू. प्रतिभूती ठेवी ठेवणे आवश्यक आहे. यात्रा, जत्रा, उत्सव अशा प्रसंगीच शर्यतीचे आयोजन व्हावे. राजकीय



कार्यक्रम, वाढदिवस अशा प्रसंगी आयोजन करू नये.बैलगाडा शर्यत, शंकरपट, छकडी आदींसाठी धावपट्टी एक हजार मीटरपेक्षा कमी लांबीची असावी. शर्यतीची धावपट्टी अतिशय उतार असलेली, दगड- खडक असलेली, दलदल असलेली, पाणथळीची असू नये. धावपट्टीपुढे बैलगाडीचा वेग मंदावण्यासाठी पुरेशी सपाट जागा ठेवावी. रस्त्यावर किंवा महामार्गावर शर्यती आयोजित करण्यात येऊ नये.कोणत्याही बैल किंवा वळूचा वापर एका दिवसात तीनपेक्षा अधिक शर्यतीत करू नये. बैलांना धावपट्टीवर आणण्याआधी ३० मिनीटे आराम द्यावा. पुरेशी सावली, चारापाणी असावे. पशुवैद्यकीय आरोग्य प्रमाणपत्र असावे. केवळ एका गाडीवानास बैलगाडा चालविण्याची परवानगी आहे. शर्यतीदरम्यान बैलास दुखापत होईल असे चाबूक, काठी आदी साधन वापरू नये. प्राण्यांच्या, गाडीवानाच्या व प्रेक्षकांच्या सुरक्षेची जबाबदारी आयोजकांवर आहे.

# प्राथमिकमधून डॉ. माकोडे, माध्यमिकमध्ये सुधीर केने प्रथम

## जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेचा निकाल घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती** - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावतीद्वारा नवोपक्रम स्पर्धेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला. प्राथमिक शिक्षक गटातून डॉ.अनिल माकोडे तर माध्यमिक शिक्षक गटातून सुधीर केने यांनी प्रथम क्रमांक पटकावित जिल्हास्तरीय स्पर्धेत बाजी मारली. शिक्षकांमध्ये नावीन्यपूर्ण अध्ययन अध्यापनाला चालना मिळावी व विद्यार्थ्यांचे शिकणे अधिक सुलभ व्हावे या करिता दरवर्षी नवोपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने नवोपक्रम स्पर्धेचे पाच गटात आयोजन करते. या स्पर्धेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला.

पूर्व प्राथमिक गटात दहीगाव अंगणवाडी केंद्राच्या खुर्दच्या चैताली सावरकर ह्यांनी प्रथम तर बऱ्हाणपूर अंगणवाडी केंद्राच्या कोमल ढगे यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला.प्राथमिक शिक्षक गटातून प्रथम क्रमांक जिल्हा परिषद शाळा सालेपुर येथील डॉ.अनिल मोकोडे,द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद शाळा शिरपुरच्या वर्षा सुर्यवंशी, तृतीय क्रमांक जिल्हा परिषद शाळा मल्हाराचे बबलू कराळे,चतुर्थ क्रमांक जिल्हा परिषद शाळा सालणापुरचे विनोद राठोड पाचवा क्रमांक जिल्हा परिषद शाळा आडगावच्या कांचन खाडे यांनी पटकाविला. जिल्हा परिषद कन्या हायस्कूल अमरावती येथील वीरेंद्र ब्राम्हण व जिल्हा परिषद शाळा बऱ्हाणपूर चे डॉ. निलेश इंगोले हे उत्तेजनार्थ





बक्षिसांचे मानकरी ठरले.

माध्यमिक गटात प्रथम क्रमांक तुकडोजी महाराज विद्यालयाचे सुधीर केने, द्वितीय क्रमांक जनता हायस्कूल वरूडचे अतुल पडोळे, तृतीय क्रमांक टोंपे महाविद्यालयाचे प्रणित देशमुख, चतुर्थ क्रमांक मन्नालाल गुप्ता क्रमांक रामकृष्ण विद्यालय कांडलीचे विनायक ताथोड, तर उत्तेजनार्थ म्हणून पंचशील विद्यालय कारंजाच्या शुभांगी पापळकर, माध्यमिक विद्यालय उत्तमसरा येथील शीतल भोपाळे यांनी बाजी मारली.स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या सर्व स्पर्धकांचे प्राचार्य मिलिंद कुबडे, ज्येष्ठ अधिव्याख्याता प्रेमला खरटमोल, स्पर्धा समन्वयक डॉ.विजय शिंदे, पवन मानकर, डॉ.राम सोनारे, डॉ.विकास गावंडे, डॉ. दीपक चांदुरे आदींनी अभिनंदन केले.

# अमरावतीत प्रजासत्ताक दिनी राज्यमंत्री इंद्रनील नाईक करणार ध्वजारोहण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती –** भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२५ रोजी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे.

या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८.३० ते १० या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्ध शासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये, असे राजशिष्टाचार विभागामार्फत कळविण्यात आले आहे. काही मंत्र्यांकडे दोन जिल्ह्याची पालकमंत्रीपदाची जबाबदारी असल्याने त्यावर तोडगा म्हणून पालक मंत्रीपदाची जबाबदारी न मिळालेले मंत्री काही जिल्ह्यांमध्ये ध्वजारोहण करणार आहेत. सरकारने या संदर्भात एक पत्रकच जारी केले असून अमरावतीमध्ये प्रजासत्ताकदिनी होणार्या मुख्य शासकीय समारंभात राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे ध्वजारोहण करणार आहेत.



मुंबई येथील मुख्य शासकीय समारंभात राज्यपाल यांच्या हस्ते व मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क दादर मुंबई येथे ध्वजारोहण व समारंभपूर्वक संचलन कार्यक्रम होईल. विभागीय आणि जिल्हा स्तरावर पुढे दर्शविल्याप्रमाणे मंत्री अथवा राज्यमंत्री ध्वजारोहण करतील.

ठाणे – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पुणे – उपमुख्यमंत्री अजित पवार, नागपूर मंत्री सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, अहिल्यानगर – राधाकृष्ण विखे पाटील, वाशिम हसन मुश्रीफ, सांगली चंद्रकांत (दादा) पाटील, नाशिक– गिरीश महाजन, पालघर गणेश नाईक, जळगाव– गुलाबराव पाटील, यवतमाळ– संजय राठोड, मुंबई शहर– मंगलप्रभात लोढा, मुंबई उपनगर ड. आशिष शेलार, रत्नागिरी– उदय सामंत, धुळे – जयकुमार रावल, जालना– श्रीमती पंकजा मुंडे, नांदेड– अतुल सावे, चंद्रपूर– अशोक उईके, सातारा– शंभुराज देसाई, बीड दत्तात्रय भरणे, रायगड आदिती तटकरे, लातूर– शिवेंद्रसिंह भोसले, नंदुरबार ॲड. माणिकराव कोकाटे, सोलापूर– जयकुमार गोरे, हिंगोली– नरहरी झिरवाळ, भंडारा– संजय सावकारे, छत्रपती संभाजीनगर संजय शिरसाट, धाराशिव प्रताप सरनाईक, बुलढाणा– मकरंद जाधव (पाटील), सिंधुदुर्ग – नितेश राणे, अकोला– आकाश फुंडकर, गोंदिया– बाबासाहेब पाटील, कोल्हापूर– प्रकाश आबिटकर, गडचिरोली ॲड. आशिष जयस्वाल, वर्धा– पंकज भोयर, परभणी श्रीमती मेघना दीपक साकोरे बोर्डीकर आणि अमरावती मध्ये राज्यमंत्री इंद्रनील अनिता मनोहर नाईक हे ध्वजारोहण करणार आहेत.–

# राज्यात १९ दिवसांत आठ वाघांचा मृत्यू, शिकारीचा संशय; वन खात्याचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**



वाघांचा मृत्युदर ५० टक्क्यांनी कमी झाला म्हणून आनंद साजरा करणार्या राज्यात गेल्या १९ दिवसांत आठ वाघांचा मृत्यू झाला. हे सर्वच मृत्यू संशयास्पद आहेत, पण कोणत्याही अधिकार्याला त्यासाठी जबाबदार धरण्यात आले नाही. त्यामुळे वन खाते खरोखरच वाघांच्या संरक्षण व संवर्धनाविषयी गंभीर आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, बल्लारशा–गोंदिया रेल्वेमार्गावर रविवारी सकाळी रक्सौल एक्स्प्रेसने सिंदेवाही–आलेवाहीजवळ धडक दिल्याने वाघाचा जागीच मृत्यू झाला.चंद्रपूर–बल्लारपूर रेल्वेमार्गावर आजवर ५० पेक्षा अधिक वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे. राज्यात आतापर्यंत झालेले वाघांचे मृत्यू भविष्यात वाघांना असणारा धोका दर्शवणारे आहे. वाघांचे तीन तुकडे करून जंगलात फेकल्यानंतरही वनाधिकार्यांना माहिती होत नाही. शिकारी वाघाची शिकार करून १२ नखे आणि दात काढून नेतात, पण त्याची साधी कुणकुणही त्यांना लागत नाही. वाघिणीचे बछडे उपासमारीने मरतात, त्यांची आई अजून सापडलेली नाही. वाघ नाल्याजवळ मृतावस्थेत पडलेला असूनही ते माहिती होत नाही. यातील दोन घटना स्पष्टपणे शिकारीकडे बोट दाखवणार्या आहेत. या शिकारी स्थानिकांना हाताशी घेऊन बहेलिया शिकारी टोळ्यांनी घडवून आणल्या असतील तर संपूर्ण राज्यासाठी ती धोक्याची घंटा आहे.

# नेरपिंगळाई येथे कर्जबाजारी शेतकऱ्याची राहत्या घरात गळफास लाऊन आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नेरपिंगलाई** – नेरपिंगळाई येथील शेतकरी प्रकाश भगवंतराव पोटे (वय ५०)कर्जबाजारी शेतकऱ्याची राहत्या घरात गळफास लावून आत्महत्याग्रामीण भागात अनेक नागरिकांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असल्याने गावातील शेतकरी प्रकाश भगवंतराव पोटे यांनी वडलोपार्जित कर्ज १९०००० नातेवाईकांमार्फत अंदाजे २००००० उसनवारी करून शेतीची पेरणी केली त्यात अनेक वर्षांपासून सततच्या नापिकीमुळे शेतीचे उत्पन्न कमी होत असल्यामुळे व शेतीमालाला भाव मिळत नसल्यामुळे जोडधंदा म्हणुन फायनान्समार्फत ७४०००० किमतींचा ट्रॅक्टर विकत घेतला



मात्र शेतीचे उत्पन कमी पडल्याने ट्रॅक्टर ची किस्त फेडणे सुद्धा कठीण झाले होते त्यात तिन एकर शेती असून एकीकडे उत्पन्न कमी तर दुसरीकडे डोक्यावर कर्जाचा डोंगर अश्यात चिंताग्रस्त असलेल्या प्रकाश भगवंतराव पोटे यांनी दिनांक २० जानेवारी रोजी राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली यांच्या मागे पत्नी एक मुलगा एक मुलगी आहे अशी माहिती घरच्यांनी दिली शव मोर्शी येथे नेण्यात आले घटनास्थळी ठाणेदार सचिन लूले याच्या मार्गदर्शनात बीट जमादार मनोज कळसकर यांनी पंचनामा केला तर तलाठी मनोहरे व कोतवाल राजेश मोहोकार यांनी तहशीलदार याच्या कडे प्रकाश पोटे यांची शेतकरी आत्महत्येची माहिती दिली यावेळी ग्रामसेवक विनोद मनवर हे सुद्धा उपस्थित होते.–

# शिस्त,उत्साह आणि आनंदाची पायदळ वारी आज शेगावात

## आज पायदळ वारीचा समारोपवारकऱ्यांचे ठिकठिकाणी स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नांदगाव पेठ**

संत श्री काशीनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवानंतर नांदगाव पेठ येथून निघालेली पायदळ वारी आज (मंगळवारी) शेगाव येथे दाखल होणार आहे.१६ जानेवारी पासून अत्यंत शिस्तबद्ध,उत्साह आणि आनंदमय वातावरणात निघालेल्या या पायदळ वारीचा आज शेगाव येथे संत श्री. गजानन महाराज यांच्या दर्शनानंतर तसेच मंदिर प्रदक्षिणानंतर वारीचा समारोप होणार आहे. मंगळवारी सकाळी ७ वाजता अंदुरा येथून पायदळ वारी शेगावकडे प्रस्थान करणार असून १२ वाजता लोहारा येथील साहेबराव



इंदोरे यांच्या शेतात भोजन दुपारी ४:३० वाजता संत श्री. गजानन महाराज मंदिर येथे श्रींचे दर्शन व प्रदक्षिणा व नंतर सायंकाळी अग्रसेन भवन येथे भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.सहा दिवस ही पायदळ वारी विविध ठिकाणी भजन कीर्तन तसेच संत काशीनाथ महाराज व संत गजानन महाराज यांचे नामस्मरण करत सुखरूप आज श्रींचे दर्शन घेऊन नांदगाव पेठ ला परतणार आहे. पायदळ वारीला सहकार्य करणाऱ्या तसेच ठिकठिकाणी निवास,भोजन व चहा नाश्त्याची व्यवस्था करणाऱ्या महानुभावांचे शाल, श्रीफळ देऊन वारीचे संयोजक शिवराजसिंह राठोड, रुपेश पोटफोडे, विपुल पालिवाल,संदीप यावले यांच्या वतीने सत्कार करून त्यांचे आभार व ऋण व्यक्त केले.या पायदळ वारीमध्ये नांदगाव पेठ मधील वारकरी महिला, उपस्थित होते.

# डिजिटल विद्युत मीटर विरोधात ग्राहकांचा रोष

## सहकाऱ्यांच्या इच्छेविरुद्ध मीटर लावत असल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अचलपूर** – राज्यात डिजिटल विद्युत मीटरला विरोध होत असतांनाच महावितरण जबरदस्तीने डिजिटल विद्युत मीटर लावत आहे, त्यामुळे ग्राहकांमध्ये तिव्र असंतोष पसरला आहे. डिजिटल विद्युत मीटर लावण्यास ग्राहकांची परवानगी आवश्यक असताना महावितरण जबरदस्तीने डिजिटल विद्युत मीटर लावत असल्याने जनतेने आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहे. मोठ्या शहरात डिजिटल विद्युत मीटर लावण्यास विरोध केला, त्यामुळे तेथे मीटर लावण्वास स्थगीती देण्यात आली. मात्र महावितरण ग्रामीण व छोट्या शहरात जबरदस्तीने ग्राहकांचे विद्युत मीटर बसवित आहे. अचलपुर सारख्या छोट्या शहरातील स्लम एरीयात जवरदस्तीने विद्युत मीटर बदलवीत ज्यांचे फॉल्टी मीटर आहेत व जे नवीन जोडणी घेत आहेत त्यांना सुध्दा डिजिटल विद्युत मीटर बसविण्यात येत आहेत. मात्र ज्यांच्या मोटरमध्ये काहीच त्रुटी नाही, अशांना सुध्या



डिजिटल मीटर बसविण्यात वण्यात येत आहेत. विशेष म्हणजे डिजिटल विद्युत मिटर बसविण्यासंबंधी ग्राहकांची परवानगी घेणे आवश्यक आहे, मात्र महावितरणचे अधिकारी व कर्मचारी ग्राहकाला न विचारता व साधे मीटर आहे असे खोटेबोलून जबरदस्तीने डिजिटल मीटर ग्राहकांच्या माथी मारत असल्याचे ग्राहक सांगत आहे. डिजिटल मीटर मध्ये प्रि पेड व पोस्ट पेड अशी निवड करण्याची ग्राहकाला सुट असतांना महावितरण मात्र ग्राहकांना न विचारता नवीन मीटर बसवीत आहे. तसेच या नवीन मीटर मुळे ग्राहकांना जो आर्थिक भुर्दंड बसणार आहे, याला जबाबदार कोण असाही प्रश्न नागरिक विचारत आहे. महावितरण कंपनीने जबरदस्तीने डिजिटल मोटर बसवू नये व जेथे बसवले असतील ते त्वरित काढून घ्यावे, ज्याग्राहकांची पूर्व परवानगी असेल त्यांनाच डिजिटल विद्युत मीटर द्यावे अन्यथा तिव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संत गाडगे महाराज तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष प्रमोद नैकेले यांनी दिला आहे, तसेच स्थानिक जनप्रतिनिधी यांनीसुध्दा याबाबत तातडीने कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

# शेंदोळा खुर्द येथे विदर्भस्तरीय खंजिरी भजन संमेलन

## स्पर्धेला ५१ मंडळांचा प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१शेंदोळा खुर्द–** शेंदोळा खुर्द येथे विदर्भस्तरीय खंजिरी भजन संमेलन, भजन स्पर्धेला यंदा विविध गटात ५१ मंडळांचा भरघोस प्रतिसाद लाभला. खंजिरी भजन स्पर्धा प्रौढ, महिला व बाल अशा तीन गटात घेण्यात आली. स्पर्धेचे परीक्षण डॉ. प्रमोद बैस व सुधाकर चौधरी यांनी केले. तसेच भजन संमेलनाचे परीक्षण संतोष साव व पंकज मांडवगणे यांनी केले.

अमरावती येथे भजनासाठी जात असताना आदर्श ग्राम शेंदोळा खुर्द येथील भजन मंडळाच्या गाडीचा २००३ मध्ये अपघात झाला होता. त्या अपघातात गावातील नितीन नागमोते, अनिल घाटोळ, ईश्वर विभुते, राजू डहाके, प्रेम तायडे व शरद खेरडे या सहा तरुण भजन रत्नांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २००३ पासून दरवर्षी शेंदोळा येथे विदर्भस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेचे आयोजन केले जाते.

या स्पर्धेची सुरुवात श्री गुरुदेव महिला भजन मंडळ शेंदोळा खुर्द यांच्या भजनाने करण्यात आली. त्यानंतर गावातील भजन सेवेसाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या सर्व भजनरत्नांना 'स्वर गुरुकुंजाचे' या कार्यक्रमाद्वारे सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर

### हे ठरले विजेते .......

प्रौढ गटातील प्रथम बक्षीस अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ रिधोराने मिळवले तर महिला गटातून संतकृपा महिला भजन मंडळ चंद्रपूर प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. बालगटातून प्रथम क्रमांकासाठी मानव सेवा छात्रालय भजन मंडळ गुरुकुंज आश्रमने बाजी मारली तर भजन संमेलनात आदर्श गुरुदेव भजन मंडळ निमगव्हाण या मंडळाने ईश्वर चिठ्ठीद्वारे प्रथम क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे.



सामुदायिक प्रार्थना व महाआरती झाली. या कार्यक्रमाचे संयोजन अमोल बांबल अधीक्षक मानव सेवा छात्रालय यांनी केले. डॉ. राजेंद्र आखरे यांनी सामुदायिक प्रार्थनेचे महत्त्व विशद केले. त्यानंतर भजन संमेलनाला सुरुवात करण्यात आली.स्व. भजनरत्नांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी उपस्थित सर्व भजन मंडळांना प्रत्येकी ११०० रुपये रोख देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थित २७ भजन मंडळांपैकी सुरवाडी येथील महिला भजन मंडळाला ७ हजार रुपये रोख पुरस्कार ईश्वर चिठ्ठीद्वारे प्राप्त झाला. सूत्रसंचालन प्रवीण हरणे व अजय अडीकणे यांनी केले. भजन संमेलन व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उमप, गजानन मांडवगणे, दीपक आंबुलकर, प्रदीप देशमुख, विनोद निस्ताने, पवन पानगेकर, अंकुश माहुलकर, सचिन नागमोते, सागर डांबले, रामेश्वर बांबल, आदित्य निंघोट आदींनी परिश्रम घेतले.

# खानापूरच्या निवासी अंध विद्यालयाने गाजविली जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

हिवरखेड : दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा १५ ते १७ जानेवारी दरम्यान श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे पार पडली. त्यामध्ये मोर्शी तालुक्यातील खानापूर येथील निवासी अंध विद्यालयाच्या १६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी ३ विद्यार्थ्यांनी सुवर्ण, १० विद्यार्थ्यांनी रजत, तर २ विद्यार्थ्यांनी कांस्य पदक पटकाविले.



पूनम कुमरे हिने गोळाफेक तसेच १०० मिटर धावणे प्रकारात सुवर्ण, रामनाम उईके याने लांब उडीत सुवर्ण पटकाविले. तर मिथिलेश उईके याने १०० मिटर धावणे, युवराज काकडे गोळाफेक, फुलवंती भलावी हिने लांब उडी, आशा जावरकर हिने ५० मिटर धावणे, अनिका पाटील हिने २५ मिटर धावणे,गोपाल जावरकर याने २५ मिटर धावणे, अनुज धुर्वे ५० मिटर धावणे, शिवकुमार धुर्वे व कांता धोटे यांनी पासिंग द बॉल तसेच अनुष्का उईके हिने २५ मिटर धावणे या प्रकारात रजतपदक पटकाविले. विद्यार्थ्यांनी या यशाचे श्रेय मुख्याध्यापक व शिक्षकांना दिले.

# एनएचएमचे कर्मचारी दोन महिन्यांपासून वेतनाविना

## प्रशासनाविरोधात रोष, ५ तारखेपर्यंत पगार द्यावी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती–** शासनाच्या अखत्यारित असलेल्या संस्थांमध्ये दर महिन्याच्या १ तारखेला कर्मचाऱ्यांचा पगार होणे अपेक्षित आहे. परंतु एनएचएमच्या १ हजार २७ कर्मचाऱ्यांना डिसेंबरचे वेतन मिळाले नाही तर जानेवारीची देखील पगाराची तारीख जवळ आली आहे. त्यामुळे कित्येक कर्मचाऱ्यांना विविध कर्जाचा भरणा न केल्याने याचा अतिरिक्त भूर्दंड त्यांना सोसावा लागला आहे.जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अख्यत्यारित राष्ट्रीय आरोग्य मिशन अर्थात एनएचएम विभाग येतो. जिल्हा परिषदेच्या इतर विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे डिसेंबर महिन्याचे वेतन झाले आहेत. परंतु एनप्ट्रपम विभागातील १ हजार २७ कर्मचाऱ्यांचा डिसेंबरचा पगार अद्यापही जमा झाला नाही. जानेवारी महिन्याचे बिल टाकण्याची प्रक्रिया सोमवारपासून सुरू झाली आहे. त्यामुळे जानेवारीसह दोन महिन्यांचे पगार थकले आहे. परिणामी बहुतांश कर्मचाऱ्यांनी घर, वाहन, मुलांचे शिक्षण व अन्य कारणांकरिता बँकेतून कर्ज काढले आहेत. त्यांची किस्त १० ते १५ तारखेच्या आत लागते. अशातच डिसेंबरचा पगार न झाल्याने कित्येकांना बँकेच्या दंडाचा भूर्दंड सोसावा लागला आहे.

# मंगळसूत्र पळवणारी चौकडी अखेर गुन्हे शाखेच्या जाळ्यात:शहरातील तीन गुन्हे उघड

## चैन स्नॅचिंगचा सुरू होता तपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती –** झटका मारून मंगळसूत्र पळवणाऱ्या चार जणांना गुन्हे शाखेच्या युनिट एकने पकडले आहे. सोमवारी ताब्यात घेतलेल्या त्या चार चोरट्यांनी शहरातील तीन मंगळसूत्र, पोत चोरीच्या तीन घटनांची कबुली दिली आहे. या चार चोरट्यांकडून त्यांनी गुन्ह्यात वापरलेल्या तीन दुचाकी जप्त केल्यात.

शेख इरफान शेख जब्बार (२०, रा. गुलिस्तानगर), शेख समीर उर्फ अमीका नवाब वल्द शेख युनूस (२१, रा. छायानगर), शेख फैजान शेख रहिम (१८, रा. यास्मिननगर) व सै. तवेद उर्फ नावेद सै. आबीद (२६, रा. यास्मिननगर, अमरावती) यांचा समावेश आहे. चौघेही नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी आहेत. दरम्यान सीपी नवीनचंद्र रेड्डी यांनी गुन्हे शाखेला शहरातील मंगळसूत्र चोरीसह इतरही गंभीर गुन्ह्यांचा उलगडा करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेच्या टीमकडून तपास सुरू होता. त्यामधूनच चौघेही त्यांच्या हाती पडले. या लुटारूंनी केवल कॉलनी, अर्जुननगर बसस्टॉप व जयसियाराम नगर ते विलास नगर मार्गावरील अशा तीन गुन्ह्यांची कबुली दिली. १९ जानेवारीला जयसियाराम नगर ते विलास नगर रोडवर झालेल्या चेन स्नॅचिंगचा समांतर तपास करत असताना त्या गुन्ह्यातील मोपेडवरील मागे बसलेला व्यक्ती हा सडपातळ व



मोठे केस असलेला असल्याचे लक्षात आले. त्यानुसार त्या वर्णनाच्या व्यक्तीला इक्बाल नगर चौक येथून सोमवारी सायंकाळी ताब्यात घेण्यात आले. त्याने त्याचे नाव शेख इरफान शेख जब्बार असे सांगितले. त्याच्या माहितीवरून अन्य तिघांना अटक करण्यात आली. चारही आरोपींनी गाडगेनगर हद्दीत घडलेल्या चेन स्नॅचिंगच्या तीन घटनांची कबुली दिली. प्रत्येक घटनेत गाडी चालवणारे वेगवेगळे आहेत. आरोपींकडून तीन दुचाकी जप्त केल्या. ही कारवाई युनिट एकचे पीआय गोरखनाथ जाधव, एपीआय मनीष वाकोडे, पीएसआय प्रकाश झोपाटे व त्यांच्या पथकाने केली आहे.

सीसीटीव्ही फुटेजवरून मिळाली पोलिसांना चोरट्याची लिंक बऱ्याच ठिकाणी दोन तरुण हे दुपारच्या वेळी विरळ भागात पायी जाणाऱ्या महिलांची सोनसाखळी हिसकावून पळून जात असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले होते. दरम्यान घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजहून दोनपैकी एक जण सडपातळ व मोठे केस राखलेला असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

### प्रत्येकवेळी बदलवित होता रायडर

शेख इरफान हा सराईत चेन स्नॅचर आहे आणि मंगळसूत्र चोरी करताना तो दुचाकीवर मागे बसत होता. दुचाकी चालविणारा रायडर प्रत्येक वेळी बदलवित होता. त्यामुळे आतापर्यंत तो पोलिसांच्या हाती लागला नाही. परंतु सायबर पोलिसांनी अथक परिश्रम करून व ऑनलाईन डाटा गोळा करून इरफानची माहिती घेतली. त्यानंतर त्याल अटक करण्यात पोलिसांना यश आले.

# विभागीय सहनिबंधकांनी फेटाळल्या उपविधीतील दुरूस्त्या

## पुन्हा जिल्हा बँकेचे राजकारण तापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

दी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सत्ताधारी पदाधिकाऱ्यांना पुन्हा एकदा जोराचा धक्का बसला आहे. सत्ताधाऱ्यांनी केलेल्या उपविधीतील दुरुस्त्या विभागीय सहनिबंधकांनी फेटाळून लावल्या आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा जिल्हा बँकेचे राजकारण कमालीचे तापले आहे.

दुरुस्ती केलेल्या उपविधीविरोधात हरीभाऊ मोहोड व इतर १२ संचालकांनी सहकार मंत्र्यांकडे अपील दाखल केली होती. बँकेच्या उपविधीचे प्रकरण सहकारमंत्री, उच्च न्यायालय व विभागीय सहनिबंधक यांच्याकडे गेल्या वर्षभरापासून सुरू होते. संचालकांनी दाखल केलेल्या आक्षेपामुळे उपविधी दुरूस्तीच्या मान्यतेसंदर्भात निर्णय देण्याकरिता तारखा सुरू असताना उच्च न्यायालयाने सहकार मंत्री व विभागीय सहनिबंधकांकडे पुनश्च फेरविचारासाठी निर्देशित केल्यानंतर १७ जानेवारी रोजी प्रवीण फडणीस, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकारी संस्थाअधिनियम १९६० चे कलम १३ (२) (३) सहकार व वस्त्रोद्योग विभाग यांच्या आदेशाला अधिन राहून उपविधी दुरूस्ती प्रस्तावासंदर्भात कायद्याला विसंगत असलेल्या उपविधीतील दुरुस्त्या फेटाळल्या. त्यामुळे सत्ताधाऱ्यांना चपराक बसली असून बहुमतात असलेल्या विरोधकांनी हा निर्णय योग्य असल्याच्या प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत.




### न्यायालयाच्या आदेशाचेही केले उल्लंघन

उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. ५६२४/२०२४ नुसार बँकेला धोरणात्मक निर्णय घेण्यास बंदी घातली असतानाही बँकेने या आदेशाचे अनेकदा उल्लंघन करत न्यायालयाची अवमानना केली आहे. याबाबत न्यायालयात दाद मागण्यात येईल.



**रवींद्र गायगोले,**
**संचालक, दी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सह. बँक**

### बँकेच्या आर्थिक व्यवहाराचे लेखा परीक्षण करा



विभागीय सहनिबंधकांनी बँकेच्या उपविधी दुरुस्तीसंदर्भातील दिलेला निर्णय स्वागताहार्य आहे. अध्यक्ष व उपाध्यक्षासह सात संचालकांनी अल्पमतात असतानाही नियमबाह्य निर्णय घेतले आहेत. बँकेत उपविधीत फेरबदल करत काही लोकांच्या भल्यासाठी बँकेचा कायदा न पाळता स्वहिताच्या फायद्यासाठी बहुमतांच्या विरोधात जाऊन घेतलेला हा निर्णय अखेर चुकीचा ठरला. बच्चू कडू यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात नियमबाह्य ठराव झाले असून बँकेची आर्थिक स्थिती पूर्णतः विस्कळीत झाली आहे. अंधाधुंद कारभार सुरू असल्याने शासनाने ८३ अन्वये चौकशी करत बँकेच्या आर्थिक व्यवहाराचे लेखापरीक्षण करावे, जेणेकरुन मोठे घबाड बाहेर येईल.

**बबलू देशमुख, संचालक,**
**दी अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँक**

### कायदेशीर दाद मागू



जिल्हा बँकेच्या उपविधीसंदर्भात दिलेला निर्णयाविरोधात कायदेशीर लढा देत दाद मागू. उपविधी नामंजूर करण्याचा हा निर्णय योग्य नसल्याने रीतसर लढा देण्यात येईल.

**अभिजित ढेपे, उपाध्यक्ष,**
**दी अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँक**

बँकेच्या सत्ताधाऱ्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत उपविधीसंदर्भात दुरूस्तीबाबत केलेला ठराव बेकायदेशीर असल्याचे हरिभाऊ मोहोड यांनी सांगितले. बँकेने उपविधी दुरुस्तीला मान्यतेबाबत विनंती केली होती. या दोघांचा युक्तीवाद ऐकून घेत तत्कालीन विभागीय सहनिबंधक यांनी १३ ऑक्टोबर २३ रोजी बँकेच्या उपविधी प्रस्तावाला देण्यात आलेल्या मान्यतेला अस्वीकार करत विभागीय सहनिबंधकांनी उपविधी दुरुस्ती प्रस्तावावर कार्यालय स्तरावर ९ ऑक्टोबर २४ ते १४ जानेवारीदरम्यान १९ वेळा सुनावण्या घेतल्या होत्या. विभागीय सहनिबंधक यांनी उपविधीतील कायदा विसंगत दुरुस्त्या फेटाळल्याने जिल्हा बँकेच्या संदर्भातील हा निर्णय सहकार क्षेत्रात प्रामुख्याने महत्त्वपूर्ण मानल्या जात आहे.या प्रकरणात सत्ताधारी बँकेच्या विरोधातील हरिभाऊ मोहोडसह बारा संचालकांच्यावतीने ॲड निलेश गांवडे यांनी प्रभावी युक्तीवाद केला.

# जिल्हा बँकेचा रब्बी हंगाम पीक कर्ज वाटपात भोपळा

### रब्बी हंगाम : अन्य बँकांचा हात आखडता,३०टक्केच कर्ज वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

खरीप हंगामात उच्चांकी ९२ टक्के कर्ज वाटप करणाऱ्या बँकांनी रब्बी हंगामात मात्र हात आखडता घेतला आहे. सप्टेंबर ते डिसेंबर या तीन महिन्यांत फक्त ३० टक्केच पीक कर्ज वाटप केले आहे. त्यातही शेतकऱ्यांची म्हणवणाऱ्या जिल्हा बँकेचा कर्ज वाटपात भोपळा आहे. बँकांचे असहकार्य असल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत.



शेतकरी अडचणीत आलेले असल्याने रब्बीसाठी पीक कर्ज मिळण्यास अडचणी येत आहेत. खरीप कर्जामुळे बहुतेक शेतकऱ्यांना रब्बीचे कर्ज वाटप होऊ शकले नाही. तसेच खरिपात उशिरा कर्ज भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना रब्बी कर्जासाठी बँका टाळाटाळ करीत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. विशेष म्हणजे, जिल्हा शेतकरी बँकेने खरिपासाठी उद्दिष्टापेक्षा जास्त कर्ज वाटप केले. मात्र, रब्बीमध्ये पीक कर्ज वाटपाचा टक्का निरंक आहे. रब्बी हंगामात ५०० कोटींच्या पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट असताना आतापर्यंत ८,१६१ शेतकऱ्यांना १४७.५२ कोटींचे पीक कर्ज वाटप केले आहे. एकूण, कर्ज वाटपाच्या हे ३० टक्के आहे. जिल्हा प्रशासनाचा पाठपुरावा नसल्याने ही वेळ ओढावली आहे.

**बँकनिहाय कर्ज वाटप**

राष्ट्रीयीकृत बँकांना ४१३ कोटींच्या पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट असताना ८,१२६ शेतकऱ्यांना १४७ कोटींचे पीक कर्ज वाटप केले. एकूण कर्ज वाटपाच्या हे ३१ टक्के आहे. ग्रामीण बँकांना ७ कोटींच्या कर्ज वाटपाचे उद्दिष्ट असताना आतापर्यंत ३५ शेतकऱ्यांना ३९ लाखांचे पीक कर्ज वाटप केले आहे. एकूण कर्ज वाटपाच्या हे ३७ टक्के आहे. जिल्हा बँकेला ८० कोटींच्या पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट असताना आतापर्यंत एकाही शेतकऱ्याला पीक कर्ज वाटप केलेले नाही.

# विभागीय आयुक्त कार्यालयातील पथकाची जिल्हा परिषदेत तपासणी : नऊ जणांचे पथक दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांच्या आस्थापनाविषयक बाबी आणि योजनांची दिलेली उद्दिष्टे पूर्ण झाली आहेत की नाही. याची तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयातील नऊ जणांचे पथक जिल्हा परिषदेत दाखल झाले आहे. या पथकांकडून विविध विभागांच्या प्रशासकीय दस्ताऐवजाची दोन आठवड्यापासून झाडाझडती सुरू झाली आहे. जिल्हा परिषदेच्या सभेचे कामकाज, सामान्य प्रशासन विभागाकडून भरण्यात आलेली रिक्त पदे, निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी केलेली कार्यवाही, जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक तपासणीसह विविध कामे, योजना व्यवस्थित राबविण्यात आल्या आहेत की नाही याची तपासणी विभागीय आयुक्त पथकांकडून होत आहे. विभागीय उपायुक्त निरीक्षक यांनी नियुक्त केलेल्या पथकात विभागातील यवतमाळ, बुलढाणा, वाशिम आणि अकोला येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.




दरवर्षी जिल्हा परिषदेतील प्रशासकीय कामकाज, योजना व अन्य बाबींची विभागीय आयुक्त कार्यालयाच्या पथकाकडून तपासणी केली जाते. त्यानुसार २०२३-२४ ची जिल्हा परिषदेत उपायुक्तांनी नेमलेल्या पथकांकडून सध्या तपासणी सुरू आहे.

**बाळासाहेब बायस, डेप्युटी सीईओ जीएडी**

या तपासणी पथकाकडून जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांची तपासणी करण्यात येत आहे. यामध्ये औषध भांडार व लस भांडार, कुटुंब कल्याण कार्यक्रम, लसीकरण आढावा, साथीच्या आजारांना आळा घालण्यासाठी केलेल्या उपाययोजना, स्वच्छ भारत अभियान, संत गाडगेबाबा अभियान, सार्वजनिक शौचालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थेची तपासणी करण्यात येणार आहे.

**असे आहे तपासणी पथक**

जिल्हा परिषदेत सुरू असलेल्या तपासणी पथकांचे प्रमुख यवतमाळ झेडपीचे सहायक प्रशासन अधिकारी पी.जी. बिरे हे पथकप्रमुख आहेत. याशिवाय प्रकाश नांदे, वाशिम, व्ही.व्ही. शेळके बुलढाणा, मनोज जाधव वाशिम, एस. वाय. बडगे अकोला, एस.व्ही. चिकटे यवतमाळ, श्रीकांत माने कारंजा वाशिम, एम.आर. गवते बुलढाणा आणि अकोट येथील एम.एच. पुनसे आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

# चाहूल प्रजासत्ताक दिनाची.......जॅकेट, कुर्ती, साड्या, ज्वेलरीवर तिरंगी इफेक्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

हटके लूक करण्याची फॅशन आल्याने २६ जानेवारीसाठी देखील शहरातील बाजारात नव नवीन फॅशनचे तिरंगा असलेले कपडे विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्यात जॅकेट, कुर्ती, टी-शर्ट, साड्या, ज्वेलरीवर तिरंगी इफेक्ट दिलेला आहे. गुजरात, मुंबईतून या कपड्यांची आवक होत आहे. दोन दिवसांपासून या कपड्यांची मागणी होत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.



सेलिब्रेशनसाठी २५ व २६ जानेवारीला प्रत्येकजण तिरंगी कपडे किंवा विविध ज्वेलरी परिधान करतात. सध्या ऑक्सिडाइज्ड ज्वेलरी ट्रेंडमध्ये आहे. यात छोट्या पोम पोम डिझाइन्समध्ये ट्राय कलर मिळतात. जेतिरंग्याच्या रंगानुसार बसवलेले असते. यासोबतच फॅन्सी लटकन मिळणार आहे. या प्रकारचा ज्वेलरी सेट घातल्यानंतर लूक चांगला दिसतो. त्याचा विचार करून असे सेट बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आले असून, २०० ते ३०० रुपयांना मिळत आहे. हे सेट मुली सूट किंवा साडीसोबत घालू शकतात. शहरातील जवाहर गेट, अंबा एकवीरा देवी मंदिर परिसर, मोची गल्ली, इतवारा बाजार, गाडगे बाबा मंदिर परिसर, राजापेठ, नवाथे, रुख्मिणी नगर, बसस्थानक परिसर तसेच शहरातील रस्त्याच्या कडेला विक्रेते साहित्य घेऊन बसतात. दरम्यान, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा विविध प्रकारच्या व्हरायटी अधिक उपलब्ध आहेत. शाळा व संस्थांनी आतापासून अशाप्रकारचे कपडे बुकिंग करणे सुरू केले आहे.

**प्लास्टिकचे ध्वज गायब**

प्रजासत्ताक दिन जवळ आल्यानंतर रस्त्यावरदेखील ध्वज विक्रेते बसतात. या विक्रेत्यांकडे यापूर्वी प्लास्टिकचे ध्वज मिळत होते. मात्र, आता या विक्रेत्यांकडे प्लास्टिक ऐवजी कापडी अथवा कागदी ध्वज मिळू लागले आहेत. १० रुपयांपासून ते थेट शंभर रुपयांपर्यंत त्यांची किंमत आहे. प्लास्टिक बंदीचा हा परिणाम असल्याचे सांगण्यात येत आहे.

**ध्वजवंदनाच्या रंगीत तालीम**

विजयी विश्व तिरंगा प्यारा, झेंडा उंचा रहे हमारा, अशा देशभक्तिपर गीतांसह भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी प्रजासत्ताकदिनी आसमंत दुमदुमणार आहे. या दिनाच्या स्वागतासाठी सर्वजण सज्ज झाले असून, शाळा, महाविद्यालयांमध्ये ध्वजवंदनाच्या रंगीत तालीम होत आहेत.

**पुरुषांची रंगसंगतीने जॅकेटला पसंती; बुकिंगही सुरू**

प्रजासत्ताक दिनासाठी मित्र व मैत्रिणींच्या ग्रुपकडून एक सारख्या दिसणाऱ्या कपड्यांना मागणी आहे. तरुणही टी-शर्ट खरेदीवर भर देत आहेत, तर नोकरदार पुरुष हे तिरंगी जॅकेट खरेदी करत आहेत. महिला साड्यांना पसंती देत आहेत, तर तरुणी वेस्टर्न तिरंग्याच्या कुर्ती खरेदी करताना दिसून येत आहे. यंदा २६ जानेवारी रविवारी असल्याने शनिवारीच अनेक ठिकाणी सेलिब्रेशन केले जाणार आहे. त्या अनुषंगाने पोशाख निवडू बुकिंग सुरू केली आहे.

# रुग्ण कल्याण समिती व मनपाच्या वतीने स्वच्छ्ता व आरोग्यवर स्पर्धा परीक्षेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

महानगर पालिकेच्या वतीने स्वच्छ्ता जिथे जिथे आरोग्य तिथे तिथे ह्या म्हणी नुसार सर्व शहरात मार्गदर्शन शिबिर तथा आरोग्य शिबिर घेण्यात येत आहे त्याच धर्तीवर वडाळी शहरी आरोग्य केंद्र चे वतीने प्रबुद्ध नगरात माजी शिक्षण सभापती



आशिष गावंडे यांच्या प्रमुख उपस्थित व उद्घाटन डॉ.रुपेश खडसे साथ रोग अधिकारी यांच्या हस्ते करून वैद्यकीय अधिकारी डॉ .वैशाली मोटघरे यांनी सर्व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती यांच्या गोर गरीब ४ ते ७ वयो गटातील मुला मुलींना आरोग्य बद्दल व पालकांना माहिती दिली त्या छोट्या छोट्या मुला मुलींनी रांगोळी व स्वतःचे केस कापून आले, नख कापून आले रुमाल घेऊन आले ,स्वच्छ कपडे घालून आले व विविध स्पर्धा मध्ये भाग घेउन प्रावीण्य मिळवले त्या नंतर डॉ रुपेश खडसे साथ रोग अधिकारी यांनी स्वच्छ्ता बाबत माहिती देऊन डेंग्यू ,मलेरिया माहिती दिली त्याचसोबत डॉ बोराडे यांनी सुद्धा आजार व स्वच्छ्ता वर भर दिला ह्या कार्यक्रमा चे प्रास्ताविक टिबी सर्वेक्षक निखिल कळंबे ,डॉ वैशाली हिवराळे ,एकता तायवाडे ,आरोग्य सेवक विक्की भांडारकर व शेकडो नागरिक उपस्थित होते.

# पालकांच्या जाग्रुतेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास - वंसुधरा बोरकर

## लिटिल फ्लावर कॉन्व्हेंटचे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

सध्याच्या आधुनिक व अत्याधुनिक काळात शैक्षणिक क्षेत्रात व अध्यापनात नवनवीन बदल झाले असून,कमी वेळात व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमतेचा विचार करून अध्यापन पद्धतीचा वापर करून विध्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास शिक्षण संस्थांकडून केल्या जातो,मात्र विद्यार्थ्यांच्या पालकांनी सुध्दा आपल्या पाल्यां बाबत जाग्रुत असले पाहिजे,तरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो.असे विचार स्थानिक नवाथे नगर बडनेरा रोड, येथील संत गाडगे महाराज विद्यालयात लिटील फ्लावर कॉन्व्हेंटच्या उद्घाटन प्रसंगी,संत गाडगे महाराज विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका वसुंधरा बोरकर यांनी व्यक्त केले असून, त्या पुढे म्हणाल्या कि, पालकांनी केवळ शिक्षक व शिक्षण संस्थेवरच अवलंबून न राहता आपला पाल्य नियमित शाळेत जातो का,व शाळांकडून देण्यात आलेले होम करतो, का,इत्यादी बाबीवर लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे, शिक्षकांनी सुध्दा




पालकांच्या विश्वासाला तडा जाणार नाही, यासाठी आपल्याला कर्तव्यांशी प्रामाणिक असले पाहिजे, ज्या विद्यार्थ्यांचे पालक साक्षर नाहीत व मोलमजुरी करणारे असल्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे होमवर्क करुन देण्यापासून ते तपासण्याची जबाबदारी गांभीर्याने शिक्षकांनी घेतली पाहिजे, अशी सुचना याप्रसंगी माजी मुख्याध्यापिका वसुंधरा बोरकर यांनी केली असून गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्यासाठी याठिकाणी लिटिल फ्लावर कॉन्व्हेंटची स्थापन केली असून, विद्यार्थ्यांसाठी काँपुटर, विविध शैक्षणिक पुस्तके व साहित्य, स्वतंत्र वर्ग, आणि खेळण्यासाठी स्वतंत्र क्रिंडागणाची सुविधा केलेली असून याचा लाभ या भागातील पालकांनी घ्यावा,असे आवाहन याप्रसंगी माजी मुख्याध्यापिका वसुंधरा बोरकर यांनी केले आहे,सावित्रीबाई फुले व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून लिटिल फ्लावर कॉन्व्हेंटचे उद्घाटन करण्यात आले,केजी १ व केजी २ मध्ये ३ ते ६ वयोगटातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.याप्रसंगी संक्रांती निमित्ताने महीलाकरीता हळदी कुंकुवांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमास,माजी शिक्षिका सौ.सविता राठोड,पालक,सौ.शोभाताई बाबर,सौ.स्वपनाताई भालेकर,सौ.मनिषा मेटकर व सौ.सोनालीताई कोतवाल यांनी सुध्दा याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमास प्रियंका प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.रूपाली काळे,सौ.स्नेहा कळंबे,सौ.भागवत,प्रा.सुधीर ठाकरे,प्रा.राजेश दाभाडे व पालक उपस्थित होते.

# १४ तालुक्यात १६१ सदस्य व ५ सरपंचांचे पद रिक्त

## फेब्रुवारीत १११ ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणूक होणार १० फेब्रुवारीपर्यंत निवडणूक कार्यक्रमाची घोषणा ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

जिल्ह्यात गत वर्षभरापासून रखडलेल्या ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणूका फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. निवडणूक विभागाने आयोगाला रिक्तपदांचा अहवाल पाठविला आहे. त्यानूसार १११ ग्रामपंचायतींमध्ये १३१ सदस्य व ५ थेट सरपंच पदाकरीता निवडणूक होणार आहे. जिल्ह्यात ग्रामपंचायतींमध्ये निधन, राजीनामा, अपात्र अशा कारणांमूळे रिक्त झालेल्या पदांकरिता पोटनिवडणूक घेणे गरजेचे आहे. मागील एक वर्षांपासून सदर ग्रामपंचतींमध्ये पोटनिवडणूका रखडलेल्या आहेत. सुरूवातीला लोकसभा त्यानंतर विधानसभेच्या निवडणुकीमूळे या निवडणुकांना स्थगिती होती. आता या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्याने आयोगा कडून फेब्रुवारीच्या १० तारखेपर्यंत




निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याच्या हालचाली सुरू केल्याची माहीती आहे. जिल्हा निवडणूक विभागाला ३१ डिसेंबर पर्यंत रिक्त जागांचा अहवाल आयोगाने मागितला होता. सदरचा अहवाल आयोगाकडे प्राप्त झाल्याने फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात मतदार यादी कार्यक्रम लागण्याची फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात मतदार यादी कार्यक्रम लागण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात सद्या १११ ग्रामपंचायतींमध्ये १६१ सदस्य व पाच ग्रामपंचायतींमध्ये ५ थेट सरपंच पदाच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे या ग्रामपंचायतींमध्ये आता पोटनिवडणुकीची धूम सुरू होणार आहे.

**येथे होणार थेट सरपंच पदाची निवडणूक**

तिवसा तालुक्यातील आखतवाडा सरपंचपद महीला नामाप्र करीता रिक्त आहे. वणी ममदापूर सर्वसामान्य महीला, चांदूरबाजार तालूक्यातीलसर्फाबाद अनुसूचित जमाती महीला, टाकरखेडा पुर्णा अनुसूचित जमाती व धारणी तालूक्यातील खापरखेडा अनूसुचित जमाती या प्रवर्गाकरिता सरपंच पद रिक्त आहे. अशा पाच ठिकाणी थेट सरपंच पदाकरीता निवडणूक होणार आहे.

**तालुकानिहाय रिक्त पदे**

अमरावती – १, भातकुली – १२, नांदगाव खंडेश्वर – ९, चांदूर रेल्वे – ९, धामणगाव रेल्वे – ६, तिवसा –६, मोर्शी–१४, वरूड–१३, चांदूरबाजार –७, अचलपूर –१८, अंजनगाव सुर्जी –८, दर्यापूर–१८, चिखलदरा –१४, धारणी –२६, एकूण १६१

# पप्पू टप्पू उडाणटप्पू म्हणत राहुल गांधींना हिणविले

## वीर सावरकरांच्या कोठडीतून खासदार डॉ. बोंडे कॉंग्रेसवर बरसले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अंदमान निकोबार**

कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांची जीभ छाटायला नको तर जिभेला चटके द्यायला पाहिजे असे वादग्रस्त विधान करणारे भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी पुन्हा एकदा राहुल गांधी यांना लक्ष केले आहे. 'पप्पू टप्पू उडान टप्पू' म्हणत बोंडे यांनी त्यांच्यावर जहरी टीका केली आहे. त्यामुळे भाजप–कॉंग्रेस असा संघर्ष पुन्हा पेटण्याची चिन्ह आहेत.



खासदार डॉ. अनिल बोंडे पत्नी डॉ. वसुधा बोंडे यांच्यासोबत अंदमान निकोबार बेटाच्या दौऱ्यावर आहेत. केंद्र सरकारच्या हिंदी राजभाषा समितीच्या निमित्याने त्यांचा हा दौरा होत आहे. दरम्यान त्यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या सेल्युलर तुरुंगातील काळकोठडीला भेट दिली. ज्या ठिकाणी सावरकरांना काळ्यापाण्याची शिक्षा भोगावी लागली त्या कोठडीत जाऊन अनिल बोंडे यांनी सावरकरांचे स्मरण केले. त्या कोठडीत काही काळ ध्यानही केले. तसेच सावरकरांच्या पावन स्मृतीला आपण नमन करत असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले.

### सावरकरांचा त्याग अंदमानात येऊन अनुभवण्याचाही दिला सल्ला

दहा वर्षापर्यंत स्वातंत्र्यवीर सावरकरयांनी या कोठडीत वास्तव्य केले. जी माणसे वीर सावरकरांवर टीका करतात, त्यांनी या कोठडीत एकदा येऊन बघावे. सात दिवस राहून पाहावे. इथला कोल्हू चालवावा. तुरुंगातले कपडे घालावे त्यावेळी कॉंग्रेस आणि समस्त टीकाकारांना सावरकरांचे देशासाठी काय बलिदान होते, त्यांनी देशासाठी काय त्याग केला, हे लक्षात आल्याशिवाय राहणार नसल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले. सोबतच सावरकरांचा त्याग अंदमानात येऊन अनुभवण्याचाही सल्ला डॉ. बोंडे यांनी दिला.असे असतानाच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना माफीवीर म्हणून हिनविणाऱ्या राहुल गांधी यांचा देखील त्यांनी चांगलाच समाचार घेतला.

# मेळघाट हाट येथील खादी महोत्सव २५ जानेवारीपर्यंत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्र राज्यखादी व ग्रामोद्योग मंडळ व महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने बस स्टॉड समोरील सायन्सकोर मैदान येथे मेळघाट हाट येथे खादी महोत्सवाला सुरवात झाली असून २५ जानेवारीपर्यंत हा महोत्सव चालणार आहे. अमरावतीकरांनी मोठ्या संख्याने खादी महोत्सवाला भेट




द्यावी, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत जिल्ह्यात विकेंद्रीत सोलर चरखा समुह कार्यक्रम राबविण्यात येत आहे. उद्योग विभागाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समुह विकास कार्यक्रमातंर्गत सोलर चरखा समुहासाठी सामुहिक सुविधा केंद्र अमरावती एम. आय. डी. सी. क्षेत्रात प्रस्थापित करण्यात आले आहे. या प्रकल्पातंर्गत खादी व सोलर चरख्यापासून अनेक दर्जेदार उत्पादने तयार केले जात असून यामध्ये ग्रामीण भागातील ३०० पेक्षा जास्त महिलांना रोजगार प्राप्त झाला आहे. यामध्ये धारणी तालुक्यातील शंभर महिलांचा समावेश आहे. या प्रकल्पातंर्गत उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी या हेतूने २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त २० ते २५ जानेवारीपर्यंत खादी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

# देशसेवेचे ध्येय बाळगणारे अभियंते घडले पाहिजेत- मुकुल कानिटकर

## विविध स्पर्धेमध्ये जिंकलेल्या विद्यार्थ्यांना मिळाले रोख पारितोषिक व सन्मान चिन्ह

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मधील टेकलॉन्स –२०२५ तांत्रिक सोहळ्याचा समारोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

आजच्या तांत्रिक युगात केवळ ज्ञान आणि कौशल्य विकसित करून उपयोग नाही तर त्या ज्ञानाचा उपयोग देशसेवेसाठी व्हावा, हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. अभियंता होणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन केवळ स्वतःचा विकास न करता, देशाच्या उन्नतीसाठी योगदान दिले पाहिजे त्याचप्रमाणे तांत्रिक ज्ञानाचा उपयोग समाज आणि देशाच्या विकासासाठी केला गेला तरच खऱ्या अर्थाने शिक्षणाचे सार्थक होईल देशसेवेचे ध्येय बाळगणारे अभियंते घडले पाहिजेत असे प्रतिपादन विद्यार्थ्यांशी प्रख्यात वक्ते मा. मुकुल कानिटकर यांनी केले पुढे ते म्हणाले भारतातील महाविद्यालयांनी आपल्या शैक्षणिक धोरणात बदल करून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रभक्तीचे गुण रुजवावेत आजच्या स्पर्धात्मक आणि जलदगती जगात समस्या ओळखून त्यावर प्रभावी उपाय शोधण्याची क्षमता असलेले विद्यार्थी घडवणे ही काळाची गरज आहे.



विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता, समस्यांवर विचार करायला आणि त्यांचे परिणामकारक उपाय शोधायला शिकले पाहिजेत असे मत विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रख्यात वक्ते मा. मुकुल कानिटकर यांनी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मधील टेकलॉन्स –२०२५ चा समारोप समारंभात व्यक्त केले.विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक यशासाठी नव्हे, तर समाजसेवेच्या भावनेने प्रेरित होऊन शिक्षण घेतले पाहिजे,अशा विद्यार्थ्यांच्या योगदानामुळेच भारत आत्मनिर्भर आणि प्रगतिशील



राष्ट्र बनू शकतो, जेव्हा युवक स्वतःहून समाजासाठी पुढे येईल, तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होईल तसेच आपल्या ध्येयाविषयी प्रश्न विचारणे आणि त्यासाठी प्रयत्न करणे हेच खऱ्या यशाची सुरुवात आहे जीवनाचे खरे ध्येय शोधणारे विद्यार्थीच यशस्वी होतात, कारण त्यांची दिशा नेहमीच स्पष्ट असते असे मत पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

या तांत्रिक सोहळ्यांमध्ये अमरावती विभागासह महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी हॅकॅथॉन, कोडेथॉन, एक्सेलरेट, स्टार्टअप कॉम्पिटिशन प्रोजेक्ट, मॉडेल एक्झिबिशन, कॅड वॉर, टॅलेंट बॅटल, लॅन गेमिंग, सर्किट मॅनिया, बिझनेस प्लॅन, पेपर आणि पोस्टर प्रेझेंटेशन, ॲग्रीकल्चर एक्झिबिशन, स्ट्रक्ट फेस्ट, डिझाईन कॉम्पिटिशन, डिबेट फेसऑफ आणि इतर ऑन–स्पॉट इव्हेंट्समध्ये सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करून रोख पारितोषिके जिंकली. अशा सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात आली.

टेकलॉन्स हा तांत्रिक महोत्सवाचे उत्कृष्ट नियोजन पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मधील विद्यार्थ्यांच्या सोशल मीडिया क्लब, फोटोग्राफी क्लब, कल्चरल क्लब, कोडिंग क्लब, योगा क्लब, अंतर्नाद क्लब, म्युझिक क्लब , कॅम्युनिकेशन क्लबच्या वतीने करण्यात आले.

या समारोप समारंभाला संस्थेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री श्री प्रविण पोटे पाटील , संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्रेयसदादा पोटे पाटील तसेच संस्थेतील संचालक डॉ. पी. एम. खोडके ,पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. एस.एल. भुतडा, पी. आर. पोटे पाटील फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ डी. बी. रुईकर, पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचे प्रचार्य डॉ. अनिल ठाकरे, पी. आर. पोटे पाटील नर्सिंग महाविद्यालयाचे प्रचार्य प्र. सुज़ान गवई, पी. आर. पोटे पाटील बीएड महाविद्यलय प्राचार्य डॉ, ए. बी. देशमुख, पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस डब्लू देशमुख, पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीचे उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर, स्टुडंट वेल्फेअर डीन डॉ एस. के नंदा, , टेकलॉन्स कोऑर्डिनेटर डॉ पल्लवी मानकर, डॉ विशाल पडोळे सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# शिक्षकांना ७६ सुट्ट्या, प्रत्यक्षात २२ सुट्ट्यांची पर्वणी

## ९२ सुट्यांची पर्वणीच त्यामुळे शिक्षक कर्मचारी आंनदीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

शिक्षक कर्मचाऱ्यांना किती सुट्ट्या मिळतील याबाबतची उत्सुकता लागली होती. विद्यार्थ्यांपासून तर शिक्षक कर्मचाऱ्यांचे लक्ष सुट्ट्यांच्या यादीकडे लागून राहिले होते. आता ती प्रतीक्षा संपली आहे. शिक्षक कर्मचाऱ्यांना २०२५–२०२६ या वर्षातील रेकार्डवर ७६ सुट्ट्या आहेत. प्रत्यक्षात मात्र ९२ सुट्ट्यांची पर्वणीच प्राप्त झाली असळताची महिती आहे.

नवीन वर्ष सुरू झाले. नवीन शैक्षणिक वर्षातील सुट्ट्यांची प्रतीक्षा शिक्षक कर्मचाऱ्यांना लागली होती.उन्हाळ्याच्या सुट्ट्या १७ मे ते २५ जूनपर्यंत राहणार आहेत. २६ जूनला नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होणार आहे. नियोजित सुट्ट्याच्या व्यतिरिक्त रविवार व सुट्ट्यांचे दिवस सोडण्यात आले आहेत. उन्हाळ्यात ७ सुट्ट्या अधिक मिळणार आहेत.दिवाळीच्या सुट्ट्या १६ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत राहणार आहेत. १ नोव्हेंबरपासून शाळा सुरू होणार आहे. दिवाळीच्या सुट्ट्या रविवार व अन्य सुट्ट्या वगळून ५ सुट्ट्या अधिक मिळणार आहेत.



**२३० असावे शाळेच्या कामकाजाचे दिवस**

मंजूर करण्यात आलेल्या सुट्ट्यांचे पालन प्रत्येक शाळांना करायची आहे. शाळेचे कामकाज किमान २३० दिवस राहील याची दक्षता मुख्याध्यापकांना घ्यावी लागणार आहे, हे येथे महत्वाचे.

**३ मार्चपासून होणार सकाळपाळीत शाळा**

फेब्रुवारी व मार्च महिन्यात दहावी–बारावीच्या शिक्षण मंडळाची परीक्षा होणार आहे. मार्च महिन्यात उन्हाचा तडाखा असतो, तसेच शिक्षकांना परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षण करायला जावे लागते. यामुळे ३ मार्चपासून सकाळपाळीत शाळा भरणार आहेत.

**शिक्षक कर्मचाऱ्यांना एकूण ९२ सुट्ट्या मिळणार**

सार्वजनिक सुट्ट्या २४ आहेत; परंतुप्रजासत्ताक दिन, गुढीपाडवा, रामनवमी, मोहर्रम, गणेश चतुर्थी हे सण रविवारी येत आहेत. नियोजित सार्वजनिक सुट्ट्या २० ठरविण्यात आल्या आहेत. माध्यमिक, उच्च माध्यमिक, नगर परिषद, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ७६ सुट्ट्या ठरवून दिल्या आहेत. रविवार व अन्य सण वगळून शिक्षक कर्मचाऱ्यांना एकूण ९२ सुट्ट्या मिळणार आहेत. १६ सुट्ट्यांच्या मेजवानीचा आस्वाद घेता येणार आहे.

# 'त्या' लाडक्या बहिणींकडून सरकार पैसे परत घेणार? सर्वात मोठी बातमी समोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २१ मुंबई**

ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशानं गेल्या वर्षी महायुती सरकारनं लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. मात्र लाडकी बहीण योजनेवर होणाऱ्या खर्चाचा परिणाम हा इतर योजनांच्या बजेटवर पडत असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. त्यामुळे ही योजना सुरू राहणार का? असा प्रश्नही उपस्थित होत आहे. ही योजना सुरूच राहणार असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे. मात्र ज्या महिला या योजनेत बसत नाहीत, त्यांच्या अर्जाची पुन्हा पडताळणी केली जाईल, असं मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटलं होतं.

तसेच ज्या महिला या योजनेत बसत नाहीत त्यांचे पैसे परत घेतले जाणार की नाही घेतले जाणार याबाबत देखील आता चर्चा सुरू आहे. याबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मोठा खुलासा केला आहे.